संपादिका :
**शोभा पांडे**
उप संपादक
**वसंत देशपांडे**
व्यवस्थापन
**अरूण पुराणिक**

**कार्यकारी मंडळ**

**अरूण पुराणिक,**
अध्यक्ष.
**दत्तात्रय जोशी,**
कार्यकारी अध्यक्ष.
**योगेश महाशब्दे,**
उपाध्यक्ष.
**शुभांगी महाशब्दे,**
सचिव.
**अमोल कुरकुटे,**
कोषाध्यक्ष.
**पियुष कुलकर्णी**
उपकार्याध्यक्ष.
**मृणाल सेनगुप्ता,**
सल्लागार
**शिरिष कुलकर्णी,**
सल्लागार
**स्मृति पुराणिक,**
सभासद.

मुद्रक
**श्री. दत्तात्रय जोशी**
**श्री समर्थ क्रिएशन, निगडी**
**भ्रमणध्वनी : ९२७०२२३४४०**

## * अनुक्रमणिका *

संपादकिय । शोभा पांडे ।
१. आर्त हाक । संध्या वणीकर । ४ ।
२. श्रीमती अमृतादेवी बिश्नोई । प्रतिभा देशपांडे । ६ ।
३. निसर्गप्रेम आणि अभिव्यक्ती । विद्या निर्गुडकर । ८ ।
४. राम सत्य पराक्रमः । प्रा. सुमंत देशपांडे । १० ।
५. वक्ता दशसहस्त्रेषु । वसंत देशपांडे । १६ ।
६. पर्यावरणवादी (सृष्टीमार्ग) संस्था । डॉ.अरूण लोवलेकर ।१९।
७. सृष्टीमाता । पं. बळवंत पुराणिक । २२ ।
८. एकांत । संध्या भालेराव । २३ ।
९. वर्ष २०२०–२१ मधील संस्थेचे उपक्रम । २५ ।

### काव्य कुसुमांजली

१०. प्रेम कविता । प्रसाद पेटारे । ३८ ।
११. अमृत बन बरसा पानी । विद्या निर्गुडकर । ३९ ।
१२. सौदा जिंदगीका । संध्या भालेराव । ४० ।
१३. स्वर्गसुख । संध्या भालेराव । ४१ ।
१४. कागदाची होडी । उदय दाणी । ४२ ।
१५. अक्षय्य तृतीया । उमेश गोखले । ४३ ।
१६. काले मेघ । १७. माटी का पूतला । ऋचा नांदूरकर ।४४।
१८. रिमझीमणारा पाऊस । शोभा पांडे । ४५ ।
१९. रिक्त होणे । शोभा पांडे । ४६ ।
२०. निसर्गानुसार आचरण । अरूण पुराणिक । ४७ ।
२१. पुरस्कार । किर्ती कुलकर्णी । ५० ।
२२. संस्कार । प्रतिमा देशपांडे । ५३ ।
२३. युध्दज्वराची खुमखुमी । विनायक अभ्यंकर । ५५ ।
२४. Defenders of Environment । शुभांगी महाशब्दे । ६० ।
२५. थोडेच पण महत्वाचे । बाबू डिसोजा । ६२ ।

या पत्रिकेत दिलेल्या लेखांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. । सदर पत्रिका फक्त सभासदांच्या खाजगी वितरणासाठी प्रकाशित.

www.srushtimarg.org या संस्थेच्या वेबसाईटवर या अंकाचे ई–बुक वाचनाकरीता उपलब्ध आहे.

# संपादकिय

सौ. शोभा पांडे
कोथरूड, पुणे
मोबा. ७७६९८८९६३८



कोरोना सारख्या महाभयंकर वैश्विक आपत्तीमधून यशस्वीरितीने बाहेर येऊन आता मानव मोकळा श्वास घेत आहे व नव्या उमेदीने पुढील वाटचाल करीत आहे. या भयानक संकटाने मानवाला फार मोठी शिकवण दिली आहे. मानवनिर्मित वैज्ञानिक प्रगतीने भौतिक सुखाच्या आहारी जाऊन मानवी जीवन समृध्द सुखी होऊ शकत नाही. त्यासाठी ईश्वर निर्मित संसाधनांचा म्हणजेच निसर्ग आणि निसर्गातील अनेक स्थूल सुक्ष्म चराचर सृष्टीच्या अनुनूभूत सामर्थ्याचा स्विकार करणे व त्यानुसार आपल्या जीवन शैलीशी त्याची जास्तीत जास्त जवळीक साधणे हाच मानवी कल्याणाचा खरा मार्ग आहे. हे सत्य जगासमोर मांडून आपली प्राचीन मौल्यवान संस्कृती व निसर्गाचे नियम यांना अनुसरून आधुनिकतेचा समतोल राखणे हीच सर्वोत्तम जीवनशैली आहे. याच उद्‌दिष्टांचा पाठपुरावा सृष्टीमार्ग संस्थेव्दारे मागील एक दशकापासून होत आहे.

विद्वान अभ्यासू व व्यासंगी ज्ञानीजनांची व्याख्याने आयोजित करणे, विविध स्पर्धांचे आयोजन करणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, त्याव्दारे नविन पिढीला, सुसंस्कारक्षम बनविणे. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन व वन जंगलाचे संरक्षण यांचे महत्व पटवून देणे असे कार्यक्रम संस्थेव्दारा काटेकोर व नियोजनबंध्द पध्दतीने राबविले जातात. सांस्कृतिक, धार्मीक व ऐतिहासिक स्थल दर्शनासाठी सहलीचे आयोजन केले जाते.

यावर्षीच्या निसर्गवाणी अंकात ही सारी वैशिष्ठये आहेत. त्याचप्रमाणे आपल्या भारतमातेच्या मुक्ततेचा, स्वातंत्र्याचा अमृत महात्सवी उत्सव आपण साजरा करीत आहोत. त्याबद्‌दल पर्यावरण रक्षण व वृक्ष संवर्धन यासाठी प्राणपणाने लढलेल्या अनेक धैर्यशील योध्दा स्त्रियांच्या जीवन संघर्षाची माहिती सर्वांना व्हावी यासाठी त्यांच्या कार्याचा गौरवशाली इतिहास वर्णन करणारे लेख या अंकात समाविष्ठ आहेत. पर्यावरण संरक्षण व पर्यावरण प्रिय जीवनशैलीवर प्रकाश टाकणारा श्री. अरूण पुराणिक यांचा लेख, श्रीरामाच्या आदर्श जीवनतत्वावर अतिशय अभ्यासपूर्ण माहिती देणारा, संत साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. श्री. सुमंत देशपांडे यांचा लेख, प्रतिभा देशपांडे यांचा अमृतादेवी बेनिवाल यांच्या जीवनावर आधारित लेख व इतरही समृध्द साहित्य या अंकाचे खास वैशिष्ठय आहे. अशा मौलिक साहित्य विचार रत्नांनी सुशोभित असा हा अंक आहे. वाचकांना तो निश्चितच आवडेल अशी खात्री आहे.

संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. अरूण पुराणिक व सर्व कार्यकारी मंडळ तन–मन–धनाने संस्थेच्या उद्‌दिष्टपूर्तीसाठी सतत कार्यरत असतात. नवीन योजना नविन प्रकल्प आयोजित करून संस्था जास्तीत जास्त लोकाभिमुख व्हावी यासाठी प्रयत्नशील असतात.

या अंकासाठी आपले बहुमुल्य साहित्य, लेख, कविता व स्फुट लेखन देणाऱ्या सर्व साहित्यिकांचे

मनःपूर्वक आभार. या अंकाच्या जडणघडणीसाठी आधारभूत आलेल्या सर्व विद्वत जनांचे, तंत्रज्ञाचे हार्दीक ऋण व्यक्त करते.

अशा रितीने मानवी कल्याणाचे व त्यासाठी निसर्ग व पर्य्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपली संस्कृती आपल्या थोर परंपरा, आपले अनमोल ग्रंथ साहित्य, त्यातील कल्याणकारी उपदेश यांचे महत्व पटवून देण्याचे व त्यासाठी जनजागृती करण्याचे मौलीक कार्य करण्यासाठी आपण सारे कटिबध्द होऊ या. विश्वाचे नियमन करणाऱ्या पंचमहाभूतांच्या या दिव्य विश्वशक्तीपुढे नतमस्तक होऊ या व शांत समाधानी निरामय जीवन प्रवासाची शुभकामना करू या.

सर्वांना स्वास्थ्यपूर्ण व समृध्द जीवन लाभो ही सदिच्छा ! धन्यवाद. ****

सन्माननीय पदाधिकारी, सभासद आणि हितचिंतक, जाहिरातदारांना यावेळी आनंदाची बाब म्हणजे आपण नेहमीच संस्थेचे कार्य सुरळीत चालण्याकरिता आवश्यक निधी देत असता, आपणा सर्व देणगीदारांचे मनःपूर्वक आभार. संस्थेची लोकोपयोगी उद्दिष्टे व त्याकरिता केला जाणारा प्रामाणिक प्रयत्न व अत्यंत पारदर्शी आर्थिक व्यवहार व त्यातून मिळणारा जनप्रतिसाद यांच्या प्रभावाने अनेक मान्यवर दानशूर सद्गृहस्थांनी संस्थेला मनःपूर्वक देणगी दिली आहे असे देणगीदार व शुभचिंतक हे संस्थेचे आधारस्तंभ आहेत. आयकर विभागातर्फे ८० जी अन्वये या देणगीवर ५० टक्के सवलत मिळालेली आहे. त्याशिवाय संस्था सीएसआर फंडाकरिता नोंदणीकृत झालेली आहे. ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.



अरूण पुराणिक
संस्थापक अध्यक्ष
९०४९६ ८६३५०

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी
७५ व्या वर्षाच्या सर्वांना शुभकामना !

पुराणिक ज्योतिष कार्यालय

पं बळवंत पुराणिक



शिक्षण नोकरी व्यवसाय, विवाह,
भाग्योदय विदेश यात्रा, रत्नधारण
आणि पारिवारीक समस्यांचे अचुक
निदान सांगणारे

आदर्श कॉलनी, होशंगाबाद रोड,
भोपाळ (म.प्र.)
मो. : ९४०७२७८१३२
वेळ : दुपारी १ ते सायं. ५ पर्यंत

# १. आर्त हाक

आज मोठी आषाढी एकादशी विठ्ठलाच्या नामस्मरणात रमायला होणारे मन विठ्ठलाच्या दर्शनाने सुध्दा ओलावते.

आम्हा पती पत्नीची पंढरपूरला दर्शनाला जायची खुप इच्छा होती पण योग जुळून येत नव्हता. आंतरिक तळमळ, त्यांच्या दर्शनाची ओढ आणि त्याच निमंत्रण यांचा योग असेल तरच सगळं घडून येत. असेच पंढरपूरला विठूरायाच्या दर्शनाला जायचे ठरले. माघ एकादशी होती. आम्ही सकाळीच निघालो आणि ११ वाजता पंढरपूरला पोहचलो. पुर्ण पंढरपूर हरिनामात रंगलं होतं, अलोट गर्दी होती. रांगेत ३ दिवसांपासून भक्त मंडळी उभी होती. ते दृश्य बघून मन उदास झालं. आज दर्शनाचा योग नाही. कुणाची ओळख पण नव्हती. मंदीराची विश्वस्त सेवा संपूर्णपणे सरकारच्या ताब्यात होती. कडक पोलीस बंदोबस्त होता काय करावे सुचत नव्हते. मन भरून येत होते, डोळयातून अश्रू वाहात होते.

मनातली आर्त हाक त्यांच्या हृदयापर्यंत पोहचणं कठीण होती. मन म्हणत होतं मुलावरी आईने कधी रागवावे काय ? जरा विठूराया भक्तांचे ही ऐका ? जरा चौकशी करावी म्हणून प्रयत्न करीत होतो. अचानक एक पुजारी म्हणा, विश्वस्त म्हणा त्यांची गाठ पडली ते म्हणाले दर्शन होऊ शकेल पण फक्त मुखदर्शन होईल किती वेळ लागेल काही सांगता येत नाही. आमच्यासाठी तेवढे पुरेसे होते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत थांबा. मला संध्याकाळी मंदिरात भेटा. आम्हाला विठू माऊलींनी थोडी आशा दाखवली. आम्ही ५ वाजायची वाट पहात होतो. विठ्ठलाला साकडे घालत होतो. देवा आज तुझी परीक्षा आहे एवढया भक्तांना दर्शन देवून तू पण आम्हाला विसरू नको आमच्यासाठी एक क्षण पुरेसा आहे आम्हालाही तो क्षण दे. तुला काही पण मागणार नाही पण तुझं रूप एकदा डोळे भरून पाहून दे. एवढी मागणी पुरे करशील देवा ! असा सारखा संवाद मनात चालला होता.

बघ तुझी इच्छा ! प्रयत्न करून बघ असे मनात म्हणत त्याची करूणा भाकत होतो. अचानक एक उंच आडदंड माणूस आमच्याकडे येताना दिसला. सगळयांच लक्ष त्याच्याकडेच होत तो आमच्याच दिशेने येत होता. आमच्या जवळ थांबला आणि म्हणाला, चला माझ्या मागे या. आम्ही वेडयासारखे त्यांच्या मागे चालत गेलो इतका कडक बंदोबस्त असताना सुध्दा त्याला

कुणी अडवले नाही. थेट तो आम्हाला गाभाऱ्यात घेऊन गेला. भक्तांची दर्शनाची रांग थांबवली होती कारण ती वेळ गावातील सेवेकरांच्या दर्शनासाठी राखीव होती. त्यामुळे गाभाऱ्यात साधारण २५ लोक बसले होते. त्यांनी आम्हाला त्यांच्यात नेवून बसविले. १ तास आम्ही विठ्ठलाची पूजा आरती अटेंड केली. विश्वासच बसत नव्हता. मन तृप्त होवून डोळे भरून त्यांचे दर्शन घेतलं.     मन म्हणत होते ....

आज माझ्या विठ्ठलाचे रूप म्या पाहीले,
एकतारी रंगली हो दोन अश्रु वाहीले,
सावळी ती मुर्ती माझ्या लोचनी समावली,
पापणी मिटून डोळे माऊली म्या पाहीली,
धन्य झाले मन आणि शरीर सुन्न झाले होते.

विश्वासच बसत नव्हता. पूर्णपणे तृप्त होवून त्याचं दर्शन घेऊन बाहेर पडलो. त्या माणसाचे आभार मानायचे होते. पण शोधून सूध्दा तो कुठेच दिसला नाही. खरंच प्रत्यक्ष विठ्ठलमुर्ती आमच्या सोबत होती. मनातून आणि ह्दयातून दिलेली हाक माऊली पर्यंत पोहोचली. असे कित्येक लोक असतील त्यांची दर्शनासाठी तळमळ, दर्शनासाठी थांबण्याची तयारी प्रत्येकांसाठी ती विठूमाऊली धावून जाते. फक्त अंतरी तळमळ असावी लागते. आमची हाक त्यांच्यापर्यंत पोहोचली म्हणूनच आम्हाला त्यांचं दर्शन लाभलं. आता मी म्हणू शकते खरच आम्ही त्यांचे लाडके भक्त असू पण तो मात्र माझा खुपच लाडका देव आहे. ध्यानी मनी स्वप्नी तो माझ्यासोबत असतो. हा लिहीलेला माझा स्वानुभव आहे, जसं घडलं तसंच लेखणीतून उतरलं.

****

**संध्या वणीकर**
बावधन, पुणे
मोबा. ८६००६५५३०२



## २ श्रीमती अमृतादेवी बिश्नोई .........
## चिपको आंदोलनाची आद्य प्रणेता



आटपाट नगर होते. राजस्थानातील एक गांव होते. खेजडली म्हणजे शमीच्या झाडांचे तिथे खूप मोठे जंगल होते. या गावात रहात होती एक अमृतादेवी अन तिच्या तीन मुली. आसू, रत्नी व भागू. अमृताला लहानपणापासूनच वृक्ष, झाडे झुडपे यांची खूप आवड होती. आपल्या अंगणातील झाडांसोबतच ती आपल्या गावातील वृक्षांची सुध्दा खूप निगा ठेवायची. आपल्या मुलींनाही तिने वृक्ष महती पटवून दिली होती. आपल्या आई प्रमाणेच त्या ही झाडांना राखी बांधत. त्या नगरीचा एक राजा होता. त्याचे नांव महाराज अभयसिंह मारवाड. जवळपास तीनशे वर्षापूर्वीची गोष्ट आहे ही. १७३० सालातली. राजाला नवीन महाल बांधायचा होता. खेजवडली गावातील खेजडीच्या झाडांना कापून आणण्याचे शाही फर्मान निघाले. हाकिम गिरधारीसिंह भंडारी आपली लाकूडतोडी सेवा घेउन निघाले.

ही बातमी वा–याच्या वेगाने पसरली. गांवात एकच हाहाकार माजला. शमी म्हणाले खेजडीचा वृक्ष राजस्थानातच काय पूर्ण भारतात पौराणिक काळापासून प्रसिध्द आहे.

शमी शमयेते पापं, शमी शत्रू विनतशीनी
अर्जुनस्य धनुर्धारी, रामस्य प्रियदर्शिनी

श्रीरामांनी श्रीलंकेला प्रस्थान करण्यापूर्वी शमीची पूजा केली होती व अज्ञातवासांत जाण्यापूर्वी अर्जुनादिकांनी आपली शस्त्रे या वृक्षावर ढोलीमध्ये ठेवली होती. हवनांत देखील सा–या लाकडाचा वापर होतो. याचे वानस्पतिक शास्त्रीय नांव प्रिसोपिस सिनेरेरिया आहे. यांचे जंगल हिरव्या झाडांसहित तोडून आणायचे फर्मान होते. वाळवंटात, रणरणत्या उन्हात वाटसरू व प्राणिमात्राला आश्रय देणारे हे जंगल कापले जाणार . . . . या दुदैवी फर्मानाने सगळे चिंताक्रांत झाले.
खेजडली गांवात बिश्नोई समाजाचे बाहुल्य होते. बिश्नोई म्हणजे श्री विष्णूचा अवतार मानल्या गेलेल्या श्री जांभेश्वर स्वामी उर्फ जांभोजी यांचा अनुयायी वर्ग. आपल्या गुरूंच्या २०+९ (वीस व नऊ) आज्ञांचे पालन हाच यांचा धर्म. या वीस व नउ वरूनच बिश्नोई हे नांव प्रचलित आहे. हिरव्या

वृक्षांना तोडू नका व वन्य प्राण्यांचे संरक्षण करा ही त्यातील प्रमुख सुत्रे आहेत. याच समाजातील श्रीमती अमृतादेवी यांनी पुढाकार घेतला. आपल्या मुलींसह त्या जंगलाकडे रवाना झाल्या. हाकिम गिरीधारीसिंह यांची टोळी तिथे पोहोचण्यापूर्वी बिश्नोई समाज तिथे पोहोचला. अमृतादेवी व त्यांच्या मुलींनी खेजडीच्या झांडांना घटट् मिठी मारली. त्या म्हणाल्या ''सिर साँटे पर रूख रहे तो भी सस्तो जाण''म्हणजे डोके कापले गेले तरी झाड वाचणार असेल तर हा सौदा स्वस्तच म्हणावा. केवढे हे वृक्षप्रेम.

हाकिम गिरधारीसिंह यांनी साम, दाम, दंड सगळे प्रकार आजमावून पाहिले. पण या मायलेकी तसूभर सुध्दा हलायला तयार नाही झाल्या. शेवटी संतापून त्याने आज्ञा दिली त्यांच्यासहित झाडे तोडा. तिथे एकच हाहाकार माजला. पोटासाठी काम करणा-या लाकुडतोडंयानी सजेच्या भीतीने कु-हाडी चालवल्या. आपल्या तिन्ही मुलींसह अमृतादेवी शहीद झाल्या. हे पाहून गांवातील अनेक स्त्रीपुरूषांनी सुध्दा झाडाला कवटाळले. जवळपास २७० पुरूष व ९४ महिलांनी आपले बलिदान केले. राजापर्यंत ही बातमी पोहोचली. त्याला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला व त्याने आपली आज्ञा परत घेतली. पण अमृतादेवी व तिच्या मुलींचे हे बलिदान सर्वांच्या मनाला चटका लावून गेले. भाद्रपद महिन्यातील शुक्ल दशमी हा तिचा स्मृतिदिन अजुनही साजरा होतो. राजस्थांनात काय पूर्ण भारतामध्ये एकमेव ''वृक्षमेळा'' तिच्या आठवणी प्रित्यर्थ साजरा केला जातो. धन्य आहे ती अमृता देवी व तिच्या मुली. आसू, रत्नी व भागू. राजस्थान सरकारने १२ सप्टेंबर १९९४ साली हया घटनेची व अमृतादेवीच्या स्मृतीप्रित्यर्थ तिच्या नांवे पुरस्कार सुरू केल्याची घोषणा केली.

११ सप्टेंबर २००१ मध्ये हा पुरस्कार जोधपूर जवळील ग्राम चिरई येथील श्री गंगाराम बिश्नोई यांना केंद्रीय वन तथा पर्यावरण मंत्रीच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दुदैवाने हा मरणोपरांत मिळालेला पुरस्कार होता. गतवर्षी २०२१ मध्ये डॉ रागिनी शाह यांना वागड मध्ये २५,००० झाडे लावल्याबददल हा पुरस्कार देण्यात आला. भारतीय संस्कृतीमधील सर्व पूजनीय, देवतातुल्य महिलांच्या यादीमध्ये अमृतादेवीचे नाव अग्रक्रमाने झळकत राहो हीच मनोकामना. त्यांना त्रिवार वंदन. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

****



**श्रीमती प्रतिभा देशपांडे,**
९३४०२७५८४४ बैतूल (म.प्र.)

# ३. निसर्ग प्रेम आणि अभिव्यक्ती

निसर्गाबद्दल प्रेम हे प्रत्येक व्यक्तीच्या मनात असते. मनुष्य काय, पशु पक्षीही प्रकृति वर प्रेम करतात. फक्त व्यक्त करण्याची पध्दत वेगवेगळी असू शकते. एक लेखक प्रकृतिचे वर्णन आपल्या शब्दातून छान व्यक्त करू शकतो तर एक चित्रकार निसर्गाच सुंदर चित्रण आपल्या ब्रश व रंगानी सर्वांसमोर मांडतो. मग ते पहाड असो, समुद्र असो, किंवा फुल-पान असो, किंवा एखाद्या व्यक्तीच चित्र असो ते अगदी हूबेहूब व स्पष्ट असं सर्वांसमोर मांडतो. विधा कोणतीही असो पण अभिव्यक्ती ही महत्वाची असते.

आज मी मध्य प्रदेशातील बैतूल जिल्हयाबद्दल थोड सांगणार आहे. सातपुडा मधला हा एक भाग जिथे वनश्री भरपूर आहे, सुंदर पाण्याचे झरे आहेत तसेच पवित्र नदी तापीच उगम स्थळसुध्दा मुलताईला आहे. ज्याला पुरातन काळात मूलतापी असं म्हणत असे जे त्याच्या नावानेच स्पष्ट आहे. इथूनच एका लहानशा कुंडातून बाहेर पडून सातपुडयाच्या वेगवेगळया भागातून वहात गुजरातच्या खंबातच्या खाडीपर्यंत प्रवास करते. अस म्हणतात की, ही नदी गंगा नदीपेक्षाही जास्त पुरातन आहे. ही सूर्यपुत्री (ताप्ती) सूर्याच्या घामापासून उत्पन्न झालेली आहे. शनि, यमुना व यमाची बहीण आहे. हा तर झाला पौराणिक भाग ज्याचं महत्व आपल्या जागी आहेच. तसेच याचं प्राकृतिक सौंदर्य पण प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहे.

जुन्या काळातील दंडकारण्य वन ज्याचा उल्लेख पुराणात आपल्याला मिळतो तो त्रेतायुगातला काळ असो किंवा व्दापारयुगातला काळ, पांडवसुध्दा या वनातून अज्ञात काळात हया जंगलात राहिले आहेत. तसेच त्रेतायुगात राम सुध्दा वनावनातून हिंडत असताना या भागात आले होते. याचं प्रमाण आजही मुलताई जवळ बारालिंगाला स्पष्टपणे बघायला मिळते. अशी मान्यता आहे की, श्रीरामांनीच हे बारा शिवलिंग तापी नदीच्या काठावर स्थापित केले होते. इथे आजही धार्मिक कृत्य होतच असतात. शरदपौर्णिमेला इथे मेळा सुध्दा भरतो.

हयाच बैतूल जिल्हयात प्रख्यात मोठे आंतरराष्ट्रीय हास्यकवीसुध्दा होऊन गेले स्वर्गीय शैल चतुर्वेदी, स्वर्गीय नीरज पुरी तसेच होशंगाबाद आजचे नर्मदापुरम जिल्हयात श्री भवानी प्रसाद मिश्र यांची कर्मभूमी पण बैतूल होती. यांनी इथे न्यू बैतूल स्कूल ची पण स्थापना केली. भवानी प्रसाद स्वतः हिंदी, इंग्लिश व संस्कृत चे विद्वान होते. यांचा जन्म २९ मार्च १९१३ मध्ये ग्राम टिगरिया येथे झाला. यांचं लेखन कार्य खूप व्यापक आहे. पण आज मी त्यांची कविता 'सातपुडा के घने जंगल' ची चर्चा करणार आहे. हया कवितेचा भावार्थ मराठीमधून सांगायचा प्रयत्न करते आहे.

सातपुडा के घने जंगल, ऊंघते अनमने से जंगल. सातपुडयातले घनदाट जंगल सुस्तावलेले जंगल, जिथे खूप गवत आहे पलाश आहे. अनेक प्रकारच्या वेली व फुले आहे. इतके घनदाट जंगल जिथे वारं सुध्दा आत शिरू शकत नाही, जमलं तर तुम्ही शिरून बघा. इथे हिरवे, सडलेले, वाळलेले काही जळून गेलेली पाने, चालून पहा हया पानावर हे झोपेत गुंगलेले दाट जंगल.

ह्या जंगलामधून अजगर, वाघ, मोठ मोठे काळे नाग आणि अनेक पशु इथे वास करतात. जिथे खूप मकडीचे जाळे, भरपूर मच्छर जे तुमच्या चेहऱ्यावर लाल काळे डाग पाडणारे यात आत शिरून तर पहा. झाडांवर चढलेल्या वेली सुगंधी वास पसरणारे फुले जंगलात आहे. आणि इतक्या खोल आत शिरून या जंगलात आदिवासी गोंड जातीचे लोक थोडं सामान घेऊन जगतात. ज्यांच्या जवळ चार कोंबडया, चार तीतर पाळून ह्या विरान जंगलात लहानशा झोपडीत त्यावर गवत घालून तिथे राहतात. परंतु होळीच्या सुमारास जेंव्हा महुआचा मदमस्त वास दरवळतो तेंव्हा हे काळे धष्टपुष्ट गोंड लोक ढोल वाजवत नृत्य करत गाणी म्हणत होळी साजरी करतात आणि महुआची दारू पिऊन मस्त राहतात.
आणि शेवटच्या कडव्यात कवी म्हणतात 'तुम्ही या जंगलात आत शिरा इथे मृत्युचे भय नाही. इथे सुरेख झरणे, नदीचं स्वच्छ पाणी, अनेक प्रकारचे पक्षी, शंभर हरणाचे कळप चंद्रा चा शीतल सुंदर प्रकाश इथे पसरला आहे. इथे हिरव्या दुर्वा तर सुंदर फळंसुध्दा आहेत. हा सातपुडयाचं सुंदर घनदाट वन लतिकानी नटलेल्या निसर्गाच्या पाठीवर जिथले गोड लोक खूप सरळ स्वभावाचे आहे. असं हे वर्णन हिंदी कवि 'स्वर्गीय भवानी प्रसाद मिश्र' यांनी खूप छान शब्दात केलं आहे.  हा काळ काही खूप जुना काळ नाही. यांचा मृत्यु २० फेब्रुवारी १९८५ मध्ये व जन्म २९ मार्च १९१३ रोजी ग्राम टिगरिया इथे झाला. हे गांधीवादी विचारधारा चे होते. ज्याचा प्रभाव त्यांच्या लेखनात पण दिसतो. हे दुसऱ्या सप्तकातील प्रथम कवी होते. याना १९७२ मध्ये 'बुनी डुई रस्सी' काव्य कृतिसाठी साहित्य अकादमी पुरस्कार सुध्दा मिळाला आहे. यांनी १९५६-१९५८ च्या काळात आकाशवाणी मध्ये सुध्दा काम केलं आहे. इथे एक उल्लेख अजून करावासा वाटतो कि भवानीप्रसाद मिश्र ची कविता सी.बी.एस.सी. च्या बाराव्या वर्गात हिंदीच्या पुस्तकात कोर्समध्ये सुध्दा घेण्यात आली आहे. कवी स्वतःबद्दल म्हणतात, लोक मला विचारतात ' तुम्ही कां लिहीता ' तेव्हा त्यांच उत्तर होतं ' जेंव्हा मी कागद आणि पेन एकरूप होतो. तेव्हा ती कविता असते मी नसतो. असे हे निसर्गप्रेमी कवी भवानी प्रसाद मिश्र ज्यांचा अल्प परिचय मी आपणांस देण्याचा प्रयत्न केला.

****



**सौ. विद्या निर्गुडकर**
बैतुल
मोबा. ८९८९२१४१९०

# ४ रामः सत्यपराक्रमः ।

भागवत संप्रदायात कुठल्याही सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने होते, या कीर्तनाची एक मर्यादा आहे. ती म्हणजे चरित्र ते उच्चारावे । केले देवे गोकुळी ।। श्रीकृष्णाचे चरित्र गावे, त्याचे चिंतन करावे, अनुकरण करू नये. श्रीकृष्ण हे अत्यंत श्रेष्ठ अशा भावनाशून्य साक्षी अवस्थेचे आहेत म्हणूनच त्यांना ' पूर्णावतार ' म्हणतात.

श्रीरामचंद्र मात्र 'मर्यादा पुरूषोत्तम' आहेत. त्यांचे मर्यादा पुरूषोत्तमत्व जीवनाच्या प्रत्येक अवस्थेतून व्यक्त झालेले आहे. आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श मित्र, आदर्श वल्लभ, आदर्श राजा इतकेच काय आदर्श शत्रू म्हणूनही व्यक्ती विकसनाचे हे परिमाण केवळ अपूर्व व अनन्यसाधारण आहे. रामाचे जीवन म्हणजे भावना व कर्तव्य यांचा एक विलक्षण संग्राम असून जीवनाच्या अखेरच्या प्रवासापर्यंत चाललेल्या या संग्रामात कर्तव्याचा नेहमीच विजय झालेला आहे.

भरत, लक्ष्मण, सीता, मारूती इ. अनेक दैवी व्यक्तिचित्रणे रामायणात आहेत व ती आपापल्या अनुपम गोडीने व विलक्षण भव्यतेने कोणालाही सहज आकर्षित करतात. पण, तरीही राम हे त्या सर्वांपेक्षा कितीतरी वर आहेत हेच मनाला पटते. महर्षि वाल्मिकींनी तेषां केतुरिव जेष्ठो रामः सत्य पराक्रमः । ' ध्वज जसा प्रासादाहून उंच असतो, त्याप्रमाणे हे या सर्वाहून अधिकच उच्च श्रेणीवर विराजमान झाले होते' असे म्हटले आहे. ते यथार्थ आहे.

अशा रामचंद्रांच्या व्यक्तिमत्वाचा वाल्मिकी रामायणाच्या अनुषंगाने थोडासा विचार करू. रामायणाच्या वाचकाला प्रथमतः आश्चर्य वाटावे असे आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे श्रीरामचंद्र होत. महर्षि वाल्मिकींनी प्रत्यक्ष देवर्षि नारदांकडून रामचंद्राचे व्यक्तिमत्व समजून घेतले आहे, नंतरच आपले महाकाव्य रचले. रामाच्या भव्य व्यक्तिमत्वाचे स्वरूप व त्यांच्या आयुष्यातील एकंदर घटना प्रत्यक्ष रामचंद्रानाच ऐकवून त्यांच्या सत्यत्वाचे शिक्कामोर्तबही वाल्मिकीकडून करवून घेतले आहे. असे महनीय व्यक्तिमत्व महर्षिंनी प्रत्यक्ष पाहिले आणि आम्ही आम्हाला त्याचे यथार्थ दर्शन घडविले आहे.

लोकांवरील असामान्य प्रभूत्व व प्रभावी व्यक्तिमत्व :

श्रीरामचंद्राचे लोकांवर असामान्य प्रभूत्व होते. आपल्यापेक्षा कनिष्ठांची तर गोष्टच वेगळी पण अधिकाराने व वयाने वरिष्ठ असलेल्या व्यक्तींनाही कर्तव्यमार्गाचा सहज उपदेश करण्याची व तो लोकांनी आदराने ऐकल्याची वस्तुस्थिती आहे. रामचंद्र कर्तव्याचा उपदेश आपल्या बंधूंना, सुहृदांना तर करताना आढळतात, इतकेच नाही तर आपल्या पित्याला व मातेलाही उपदेश करतात. याहीपेक्षा विशेष असे की, इक्ष्वाकु वंशातील राजसिंहासनाची मान ज्यांच्यासमोर नेहमीच

आदराने वाकली त्या सर्वश्रेष्ठ वशिष्ठ महर्षिंनाही ते स्वकर्तव्याची जाणीव करून देतात.

राजा दशरथ – पुत्र मोहात सापडून रामचंद्रांना वनात पाठवावयास एक दिवसाचा तरी विलंब करावा असे दशरथ महाराज म्हणू लागले. त्यावेळी रामचंद्रांनी दशरथाचे पुत्रमोहाने विकल झालेले हृदय पाहून त्यांची घातलेली समजूत –
पिता हि दैवतं तात देवतामपि स्मृतम् ।
तस्मात दैवत मित्येव करिष्यामि पितुर्वच ।। वा.रा. अयोध्याकाण्ड, सर्ग ३४.५२

पिता हे माझे दैवत आहे, ते माझेच काय पण दैवतांचेही दैवत आहे व त्याच बुध्दीने मी पित्याच्या आज्ञेचे परिपालन करणार आहे.

कौसल्या माता – वनगमन प्रसंगी, सवतींकडून होणारी आपली दुर्दशा, पुत्राच्या ताटातुटीचे दुःख व रामावरील आपला अधिकार या तिन्ही गोष्टी सांगून कौसल्या विलाप करू लागली त्यावेळी रामाने केलेला उपदेश 'पत्नीने आपल्या पतीचा परित्याग करणे' हे नृशंसपणाचे कृत्य होय. जोवर माझे पृथ्वीपती वडिल जिवंत आहेत तोवर तू त्यांची सेवा कर, हाच सनातन धर्म आहे.

ब्रह्मर्षि वसिष्ठ : आपले वैयक्तिक वजन खर्च करून, वनवासाच्या निर्णयापासून निवृत्त होण्याचा उपदेश वसिष्ठ मुनि करीत असताना रामांनी आपल्या गुरूला दिलेले उत्तर होते
यन्माता पितरौ वृत्तं तनये कुरूतः सदा ।।रामा।।
एथ वडिल जे जे करिती । तया नाम धर्मु ठेविती ।।
तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकल ।। ज्ञाने.।।

माझ्या वडिलांचे ऋण मला फेडता येणे शक्य नाही. माझ्या पित्याच्या आज्ञेचा मी अपमान करणे शक्य नाही.

अभिजात नेतृत्व :
नेतृत्व कौशल्यात राम अग्रणी होते याची साक्ष देणारे अनेक प्रसंग आहेत.

बिभीषण शरणागती : हनुमानाखेरिज बाकी सर्वांचा विरोध असतानाही बिभीषणाला शरणागती

देण्याचा आपला निर्णय रामांनी घोषित केला व त्यावर सर्वांनी होकार भरला.

सीता त्याग : सीता त्याग प्रसंगी रामचंद्र सीतेला सांगतात, ‘ मी जो हा संग्राम केला व मित्रांच्या मदतीने विजय संपादिला तो तुझ्यासाठी केलेला नाही. माझे चारित्र्य राखावे व वंशाला लागलेला कलंक धुवून निघावा म्हणून मी हे केले.

राम हे देव आहेत, महाविष्णूंचा अवतार आहेत. रावणाचा व इतर राक्षसांचा वध देवांकडून होऊ शकत नाही, तो मानवांकडूनच होईल, म्हणून विष्णूंनी मनुष्य व्हावयाचे ठरविले व राजा दशरथालाच आपला पिता म्हणून निवडले.

आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम् ।। वा रा. युध्दकांड सर्ग १९७–११ ।।
या देवाने मानवतेचा सर्वस्वी अंगीकार केलेला आहे. इतका की त्याला आपल्या देवत्वाचा विसर पडलेला आहे.

रामाची मानवता : यौवराज्याभिषक आपल्याला होणार या कल्पनेने आनंदित होऊन राम सीतेजवळ तसा भाव व्यक्त करतात व हळवे होतात.

दुःखाविष्कार : माता कैकयीच्या महालात विपरित बातमी ऐकून दुःखी झालेले राम ही वार्ता प्रथम माता कौसल्या व मग सीतेला अतिशय व्यथित होऊन सांगतात.

वनवासातील पहिली रात्र : भरताविषयी, माता कैकयीविषयी मनात आशंका आणणाऱ्या लक्ष्मणाला रामचंद्र समजाऊन सांगतात व शांत करतात.
विनोदबुध्दी : रामाच्या विनोदबुध्दीचे द्योतक असणारे दोन प्रसंग रामायणात आहेत. शूर्पणखा प्रसंग आणि त्रिजट ब्राह्मणाचा दान मागण्याचा प्रसंग. परमेश्वराचा हा अवतार केवळ राक्षसवधासाठीच नसून मानवांना जीवशास्त्राचे शिक्षण देऊन त्यांच्या जीवनाचे देवजीवनात विकसन करण्यासाठी आहे.

‘मर्यादा पुरूषोत्तम’

रामायणात लक्ष्मणादि महान लोक हे व्यक्तित्व विकसनाचे उत्तुंग प्रासाद असतील पण राम हे त्या सर्वांहूनही उंच असे ध्वज आहेत. ते मर्यादा पुरूषोत्तम आहेत. तेषां–केतुरिव जेष्ठो रामः सत्य पराक्रमः।।

आदर्श पुत्र : चित्रकुट पर्वतावर भरताची रामचंद्राशी भेट झाली, त्यावेळी राम म्हणतात, माझ्यासारखा पुत्र मागे झाला नाही व पुढेही होणार नाही. एकवेळी लक्ष्मी चंद्राला सोडून जाईल अथवा हिमालय आपली शीतलता सोडील, कदाचित समुद्र मर्यादांचे उल्लंघन करील पण मी माझ्या पित्याची आज्ञा मोडू देणार नाही. भरतालाच ते पितृआज्ञा पाळण्याचा उपदेश करतात. 'पितृआज्ञा पाळुनि दोघे होऊ रे कृतार्थ । गीतरा.।।
भरत त्यांना म्हणतो आपल्या ऐवजी मी वनवासात जातो आपण राज्य करा. या विनिमयाच्या कल्पनेला । सेवके करावे सांगितले काम । तेथे हो तूपण कामा नये । तु.म.। ज्याला जी आज्ञा दिलेली आहे त्याने तिचेच पालन करावे असे राम सांगतात.

सुमंतांच्या बोलावण्यावरून राम माता कैकयीच्या महालात जातात. त्यावेळी कैकयी म्हणते, ' राजा शुभ बोलो वा अशुभ ते जसेच्या तसे आचरण्याची खात्री तू मला देत असशील तर महाराजांचे काय हृदगत आहे ते मी तुला सांगते, 'यावर राम माता कैकयीला म्हणतात, ' माझ्याविषयी मातेचे मनात असा संशय यावा ? धिक्कार असो माझा ! राजाच्या शब्दासाठी मी जळत्या अग्निकांडात प्रवेश करीन. जे राजाचे अभिलाखित असेल ते निःशंकपणे मला सांग, मी तुला प्रतिज्ञेवर सांगतो ते कितीही दुष्कर असले तरी मी आनंदाने ते करीन. 'रामो व्दिर्नाभिभाषते'.
राम दोनदा एकच गोष्ट बोलत नसतो.
पितृआज्ञापालनासंबंधी रामांनी कौसल्येला काही उदाहरणं दिली.
१. कण्डू नावाच्या ऋषीने पितृआज्ञा म्हणून गोवध केला.
२. आपल्याच कुळातील सगर महाराजांच्या आज्ञेवरून भूमी खणून काढताना सगरपुत्रांनी भयानक संहाराच्या अग्निकुंडात स्वतःला झोकून दिले.
३. जामदग्न्य रामाने केवळ पित्याच्या आज्ञेसाठी प्रत्यक्ष माता रेणुकेच्या कंठावरून परशु फिरविला.

रामाचे पितृआज्ञापालन राजा दशरथालाही माहिती आहे. म्हणूनच ते म्हणतात राम माझे न ऐकता प्रतिकुल वर्तन करील तर माझे प्रिय होईल.

आदर्श बंधू : लक्ष्मण व शत्रुघ्न बंधुत्वाचे आदर्श आहेत. भरताचा त्याग गोस्वामी तुलसीदासांना रामापेक्षाही पूजार्ह वाटला, पण राम ते रामच. 'तुझ्याऐवजी भरताला हे राज्य द्यावे असे राजाच्या मनात आहे' असे कैकयीने म्हणताच, रामचंद्र तिला सांगतात. अहं ही सीता राज्यंच प्राणनिष्ठान धनानिच । दृष्टो भात्रे स्वयं दद्यां भरताय प्रचोदितः।। भरताला राज्य देण्यासाठी राजाने मला आज्ञा

करण्याचे काहीच कारण नाही. माझ्या अधिकारातील कोणतीही वस्तू भरताला हवी असेल तर ती मी त्याच्या स्वाधीन करेन.

चित्रकुट पर्वताकडे येणाऱ्या भरताला पाहून लक्ष्मण, भरताला ठार मारण्याची भाषा करतो तेव्हा राम म्हणतात, ' मित्र व बांधव यांचा नाश करून मिळणारी संपत्ती मी कधीच घेणार नाही. धर्म, अर्थ, काम या पुरूषार्थाची माझी साधना अथवा पृथ्वीदेखील मला तुमच्याचसाठी हवी आहे. आपत्तीत पुत्रांनी पित्याला टाळावे वा प्राणप्रिय बंधूवर वार करावा काय ?'

भरताला अयोध्येचे राज्य करण्याविषयी सांगताना ते म्हणतात, 'पूर्वीच तुझ्या आईशी विवाहबध्द होताना आपल्या पित्याने तुझ्या आजोबांना तुझ्या आईची संतती हीच राज्याची उत्तराधिकारी होईल असे वचन दिले आहे.

आदर्श मित्र : रामायणात रामचंद्राचे दोन मित्र आहेत. निषादाधिपती गुह व वानरराज सुग्रीव

गुहकाविषयी राम म्हणतात, ''मी माझ्यावर जेवढे प्रेम करतो तेवढेच गुहावर करतो तो माझा सखा आहे.''

सुग्रीवाचे आधीच राम त्याच्या दुःखाशी एकरूप होतात, ते वचन देतात. मी वालीचा वध करीन. सुग्रीवाची स्तुती करताना म्हणतात, ' इंद्राचा वर्षाव, सूर्याचे अंधार नाहीसा करणे चंद्राच्या ज्योत्स्नेने रात्र उजळणे हे जितके स्वाभाविक तितकेच तुझ्यासारख्या मित्राचे मला लाभलेले प्रेम स्वाभाविक आहे.

आदर्श राजा : राम राजा म्हणून किती आदर्श आहे याचे वर्णन राजा दशरथाकडे वनगमनप्रसंगी प्रजेने केले. 'न हि तद् भविता राष्ट्रं राज रामो न भूपति । तद् वनं भविता राष्ट्रं यत्र रामो न भूपति । तद् वनं भविता राष्ट्रं यत्र रामो निवत्स्यति ।। वा.रा.अयोध्याकाण्ड सग्र ३७–२९।। रामराज्यात कर्तव्यनिष्ठेला स्थान आहे, कर्तव्यभ्रष्टतेला कठोर शासन आहे. उदा. शंबुकवध लक्ष्मणाला दिलेला दंड.

पराक्रमी राम : त्राटिका वध, शिवधर्नुभंग, पंचवटीत १४ हजार राक्षसांचा विनाश, वालीवध असे रामाचे पराक्रम रावणाच्या दूतांनी रावणाला कथन केले.

रामाचा आत्मप्रत्यय : राम म्हणतात, ' मी संतापलो तर माझ्या बाणाच्या भरवशावर संपूर्ण पृथ्वी जिंकून घेईन. पण तो अधर्म होईल. धर्म व सद्‌गती यासाठीच मी हे धनुष्य स्वीकारले आहे. मारीच तर रामाला एवढा घाबरला होता की तो 'र' पासून सुरू होणारा शब्दही ऐकत नसे. तो म्हणतो रामो विग्रहवान धर्मः साधु सत्यपराक्रमः।। रामाच्या रूपाने प्रत्यक्ष धर्मच पृथ्वीवर अवतरला आहे.

आदर्श वल्लभ : अरण्यकांडात रामांनी सीतेसाठी केलेला विलाप ह्रदय विदीर्ण करणारा आहे. पंचवटीत लक्ष्मणाला सीतेने कठोर वाक्य ऐकविले तरीही रामांनी दोष लक्ष्मणालाच दिला. सीतेच्या सीतेच्या विरहदुःखाने रामाचे गांभीर्य सुटून ते मोह पावल्यामुळे सुग्रीव लक्ष्मणासारख्या अनुचरांनी

त्यांचे समाधान केल्याचा प्रसंग रामायणात आहे. रामाच्या दीन दशेचे वर्णन हनुमंताने अशोकवाटिकेत सीतेजवळ केले. रामचंद्रांची सीतात्यागानंतरची विफलता अतिशय हृदयद्रावक असून अश्वमेध यज्ञात सीतेची सुवर्णप्रतिमा करण्यात त्यांचे सीतेवरील निःस्सीम प्रेम दिसून येते. रामचंद्रांनी एका कावळयावर ब्रह्मास्त्र सोडले कारण काय तर त्याने सीतेच्या चरणांगुष्ठावर चंचुप्रहार केला.

आदर्श शत्रू : रावणाच्या मृत्यूनंतर त्याची उत्तरक्रिया करावयास बिभीषण तयार होईना. त्यावेळी रामचंद्र रावणाचे श्रेष्ठत्व सांगून त्याला आदर्श राजधर्म सांगतात. शत्रूत्व मरेपर्यंतच असते, रावण मेल्यावर त्याचे शत्रूत्व संपले. तू त्याचा संस्कार केलाच पाहिजेस. आता तो माझा शत्रू नसून तुझ्याशी जे त्याचे नाते आहे तेच आता माझ्याशीही लागू पडते. रावणाचा विधीपूर्वक संस्कार झालाच पाहिजे, यात तुझेच यश वाढणार आहे.

वालीवधानंतर रामांनी किष्किंधेचे राज्य सुग्रीवाला दिले तर युवराजपद अंगदाला दिले. माता कैकयीच्या बाबतीतही शपथपूर्वक चांगली वागणूक ठेवण्याबद्दल भरताला बजावताना रामांच्या अंतकरणाची श्रीमंती जाणवते. प्रभु रामचंद्र मर्यादापुरूषोत्तम आहेत, कारण त्यांचे अंगी असलेले गुण ते ‘धृतिमान’ आहेत. सूर्याप्रमाणे तेजस्वीता त्याचे अंगी आहे. ‘बुध्दिमान, ‘नितीमान’ या गुणांचा प्रत्यय वारंवार येतो. राम ‘वाग्मी’ म्हणजे बोलण्यात चतुर आहेत ते ‘नियतात्मा’ स्वतःवरती पूर्ण ताबा असणारे (देह, मन, बुध्दि, इंद्रिय) अतिशय पराक्रमी म्हणून ते ‘महावीर्य’ आहेत. ‘वितराग’ आहेत. क्षणात राज्यत्याग करताना विचलित होत नाहीत. त्यांनी क्रोध जिंकलेला आहे, त्यांना ‘जितक्रोध’ म्हटले आहे.


कृष्णचरित्राचे चिंतन, गायन तर रामचरित्राचे अनुसरण करावे असे संतविभूती सांगतात. जीवनाची इतिकर्तव्यता आदर्श वर्तनात आहे. ‘आचार प्रभवो धर्मा’ आज अशाच चारित्र्याची समाजाला, राष्ट्राला नितांत गरज आहे. राष्ट्राचे चारित्र्य त्या राष्ट्राच्या संस्कृतीवरून इतिहासावरून आणि श्रेष्ठ व नितीमान व्यक्तित्वातून घडत असते. आजच्या जागतिक संकटाच्या काळात रामायणाने घालून दिलेला आदर्श गिरविण्याची आवश्यकता आहे. सर्वभूत हिते रतः । हा रामचंद्राच्या चारित्र्यातून मिळणारा संदेश जगाला मानवतेचा महामंत्र देणारा असून तोच विश्वकल्याण साधणारा आहे. ।। जय श्रीराम ।।

****

**प्रा. सुमंत हनुमंत देशपांडे**
भंडारा
९४२२८ ३०९२१



# ५. वक्ता दशसहस्त्रेषु - राम शेवाळकर



विदर्भातल्या मातीमध्ये उगवलेलं एक प्रसन्न व्यक्तिमत्व म्हणून राम उर्फ नानासाहेब शेवाळकर यांना सगळा वऱ्हाड ओळखतो. एक शिक्षक, प्राध्यापक, एक लेखक व एक धाराप्रवाह वक्ता म्हणून त्यांचा नावलौकिक आम्ही अनुभवला आणि यथोचित आदरही केला.

दिनांक ०२ मार्च १९३१ रोजी जन्मलेले शेवाळकर मूळचे विदर्भातल्या अमरावती जिल्ह्यातल्या अचलपूरचे. रामशास्त्री शेवाळकर हे त्यांचे पंजोबा. ते वेदशास्त्र सांगत होते. विदर्भातल्या अनेक प्रसिध्द लेखकाचे घरी वेदशास्त्राचे पठण होत होते व ती परंपरा अनेक कुटुंबामध्ये आजही आढळून येते. राम शेवाळकर याला अपवाद नव्हते. अमोघ वाणी आणि अप्रतिम भाषाशैली लाभलेला हा वक्ता अंर्तमनातून एक हळवा कवी, एक ललित लेखक, एक विचारवंत आणि त्याच बरोबर एक आदर्श पुरूष होता. कीर्तनकार वडिलांचा वारसा लाभूनही समाजातील परंपरा किंवा रूढीबाबत त्यांना आपलेपणा वाटत नव्हता किंबहुना ते त्यापासून दूरच होते. कोणत्याही तत्वांशी त्यांची बांधिलकी नसली तरीही त्यांच्या कर्त्यांना सन्मान देत व ती तत्वे बळाने पुढे नेण्याचे कार्य करीत प्रत्येक भूमिकेतील माणुसकीचा गाभा प्रचलित करणे हे त्यांचे ध्येय असायचे.

बालपणीच आईला पारखं झालेलं त्यांच व्यक्तिमत्व घडविले, ते त्यांच्या वडिलांनी आणि त्यांच्या आजीने. ते आजीला आई म्हणू लागले. आजीला, आईच्या आईला विदर्भात मोठी आई म्हणण्याची पध्दत आहे. ती शेवाळकरांनी अंगीकारली. आपल्या जन्मदात्या आई बद्दल ते म्हणतात, ‘ मी अडीच वर्षाचा असतानाच, ‘आईविना भिकारी ’झालो. तेव्हा माझे वडील फक्त ३४ वर्षाचे होते पण आम्हाला तीन लेकरांना सांभाळणे हे व्रत घेतल्याने त्यांनी दुसरे लग्न केले नाही. त्यानंतर एक्कावन्न वर्ष त्यांनी स्वतःला किर्तन सेवेत गुंतवून घेतले, त्यामुळे सतत भ्रमंती हेच त्यांचे कार्यक्रम असत.

आजीला आई संबोधण्याने जन्मदात्या आईला ‘बाई’ म्हणत असू. क्षयरोगाने तिचा बळी घेतला. त्यावेळी तो रोग असाध्य मानला जाई, म्हणून वडिलांनी खूप उपचार केले. थेट त्रिचनापल्लीच्या वैद्यांना देखील दाखवून व उपचार करून आणले पण नियतीचा खेळ वेगळाच होता. शिवाय तो आजार संसर्गजन्य असल्यामुळे मुलांना आई जवळ जाण्याची अनुमती नव्हती. कधी डोळे भरून पाहण्याचे सुखही आम्हाला लाभले नाही. वडिलांच्या अनुकरणातून अनेक कीर्तने त्यांनी पाठ केली

व त्यामुळेच त्यांचा पिंड हा सनातन संस्कृतीने परिपूर्ण झाला होता. पुढच्या काळात डॉ. मुंजे, पु. भा. भावे, हया मंडळीचा प्रभाव त्यांचेवर पडला. त्यातही नागपुरातील प्रख्यात बाळशास्त्री हरदास हयांच्या अप्रतिम वक्तृत्वाचा त्यांच्यावर अधिक परिणाम झाला व आपणही हा वारसा चालवावा हे त्यांनी मनावर घेतले. समाज प्रबोधनाचे एक उत्तम साधन वक्तृत्वाचे सामर्थ्य त्यांनी ओळखले व त्या कलेमध्ये पारंगत होण्यासाठी स्वतःच्या वक्तृत्वगुणांचा जाणीवपूर्वक विकास केला. त्यांची कर्मभूमी केवळ महाराष्ट्रच नव्हती तर त्यांनी महाराष्ट्राबाहेर अनेक व्याख्याने दिलीत. ज्यामुळे त्यांच्या वक्तृत्व कलेची दखल सबंध भारतातल्या मराठी समाजात झाली. आपल्या काव्य आणि निबंध लेखनाने साहित्यिक म्हणून लौकिक प्राप्त केलाच पण काव्य रचनामधून अध्यात्माकडे नेण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. कुठल्याही विषयावरून समाज प्रबोधन हा त्यांचा गुणविशेष त्यांच्या व्यक्तिमत्वाला आगळा वेगळा झळाळी देत होता आणि त्यांची कीर्ती आणखी प्रभावी होत होती.

शालेय शिक्षण अचलपुरात झाल्यावर अमरावतीला त्यांनी बी.ए. ची पदवी घेतली ती विदर्भ महाविद्यालयातून एम.ए. मात्र त्यांनी नागपूर विद्यापीठातून मराठी आणि संस्कृत अशा दोन्ही भाषेतून विदर्भातील वेगवेगळया महाविद्यालयात प्राध्यापकी केल्यावर स्थिरावले ते वणीच्या लोकमान्य टिळक महाविद्यालयात जेथे प्राचार्य देखील झाले.

साहित्यिक म्हणून त्यांचे पहिले प्रेम कवितेवर होते. ‘असोशी’ नावाचा त्यांचा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. बालपणीचं मातृप्रेमाला अंतरलेल्या त्यांच्यातल्या कवि मनाच्या या सौंदर्यपूजकांचे कै. बाईच्या आठवणीप्रमाणेच असणाऱ्या सायंकालीन अंतराळास कविता संग्रह अर्पण केला होता.

वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर अशा कवींच्या संस्काराचा वसा घेऊन शेवाळकरांची कविता साज लेवून अवतरत होती. त्यात कवींची अनुभूती तर होतीच पण जीवन रसायनाची उस्फूर्त जाणीव घेऊन फुलणारी देखील होती. संस्कृत व मराठी अशा दोन्ही भाषांवर प्रभुत्व आणि सनातन धर्माच्या विचारांची बैठक त्यांच्या कवितेतून सतत डोकावत असे. नवकवितेचे देखील दर्शन त्या काव्यातून अधूनमधून प्रकट होत असे. पण मनाचा मूलमंत्र, मूलधर्म मात्र सौंदर्य, प्रेम, निसर्ग असा फुललेला असे.

नक्षत्र फुलांची शेज नको मखमाली
व तिची मुलायम दूध सागरालाही
मजेत रूची निळाई, स्मिता प्रभूची भाळी
अन् व्योमकपोल चंद्रखळी खुललेली

निसर्गावरील प्रेम अंतरंगात फुलू लागते आणि प्रेम प्राप्तीचे बळ कवी मनाला फार मोठे सामर्थ्य देऊन जाते. मग सृष्टीच्या तळाशी असलेल्या अनंत तत्वाचा साक्षात्कार घडतो आणि स्वकडून विश्वभानाकडे मन उड्डाण करू लागते. त्यातून निसर्गाकडून मागणे देखील प्रगट होते. ''सारे विश्व आपंगाचा माझे क्षितिजावे मन, लाभो तनूस कृतार्थ दधिचीचे समाधान.''

''निसर्गातील नवनवीन चैतन्याचा व सृजन अविष्कार सतत निरीक्षण करणे व त्याला शब्द साज चढविणे हा त्यांचा छंद लक्षणीय मानावा लागेल. नानासाहेबांचा दुसरा कवितासंग्रह 'रेघा' पुण्यात प्रकाशित झाला व प्राध्यापक नरहर कुरूंदकरांनी त्यासाठी प्रस्तावना लिहिली. म्हणजेच ''असोशी'' तल्या मंगेश पाडगावकरापासून सुरू झालेली ही साहित्य सरिता नरहर कुरूंदकरापर्यंत पोहचली होती. त्यात त्यांनी म्हटले होते काव्य संग्रहाचे प्रयोजन असेलच तर'' ते सौंदर्य निर्मितीचे आहे.'' निरीक्षणाला तो मानाचा मुजरा होता. कुरूंदकर पुढे म्हणतात 'एखाद्या धर्मोदेशकाप्रमाणे उपदेशाची कोष्टके घेवून ती कविता जीवन समजावून सांगण्यासाठी उभी नाही. शिवाय रूपकांचे उंच डोलारे रचून जीवनावरची लांबलचक भाष्ये त्यात कोंबताना शेवाळकरांची प्रतिभा कधीही आढळणार नाही. पण त्यांची कविता म्हणजे एका संवेदनशील सौंदर्यासक्त मनाने अनुभवलेले काही उत्कट क्षण आहेत. तिसरा कविता संग्रह 'अंगारा' नावाचा होता.

''अनेक वाङ्मयीन सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थांमधून नानासाहेब यांनी विविध पदे भूषविली. विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्ष पदावर सतत नऊ वर्ष कार्य करून वैदर्भीय साहित्यिकांच्या प्रतिभेला जाणीवपूर्वक श्रेष्ठ स्थान मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्याचप्रमाणे महाराष्ट्र साहित्य परिषद हया संस्थेचे ते पदाधिकारी होते. मराठी विश्वकोश मंडळाचे ते सदस्य होते. पणजी येथे १९९४ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तीन कविता संग्रहानंतर ही त्यांचे काव्य चालूच राहिले ते त्यांच्या ललित निबंधातून, व्यक्ती चित्रातून व त्यांच्या अमोघ वाणीतून त्यांची प्रतिभा नवनवीन शिखरे शोधणारी होती, नवोन्मेशशालिनी होती. त्यांचे वक्तृत्व प्रपातासारखे होते तर त्यांचे लेखनाची नजर प्रकाशपूजनाची आहे आणि सुंदरतेचा प्रकाश देणारी आहे. राम उर्फ नानासाहेब शेवाळकरांचे व्यक्तिमत्व असे चांदणं वेलीसारखे आहे. त्यात तेज आहे आणि अंधारात उजेड देणारे व्रतही आहे. अस्सल वैदर्भीय वागणे, बोलणे आणि प्रेमदरवळ पसरवीत राहणारा हा दशसहस्त्रेषु वक्ता वाळ्याचे मळे फुलविणारा आहे, जो सुगंध तर देतोच पण शीतलता देखील देतो, देहाला आणि मनाला देखील.

****



वसंत देशपांडे
रावेत, पुणे
मोबा. ८९८९४४२३७६

# ६ पर्यावरणवादी (सृष्टीमार्ग) संस्था

वरील संस्था स्थापन करण्याची मानवाला गरज कां पडली ? कारण मानवाने नैसर्गिक पंचमहाभूतांचा संहार केला व त्याचा त्रास मानवाला भोगावा लागत आहे आणि हे जर थांबले नाही तर भावी पिढीला जगणे मुष्किल होऊन बसणार आहे. अशा संस्था जागोजागी होणे आवश्यक आहे कारण एकेदिवशी आपल्या धरतीवर एक जिवंत जीवप्राणी दिसणार नाही व पृथ्वी नष्ट होईल. पाण अशा संस्थेत काम करणारी माणसे, निसर्गप्रेमी, वृक्षप्रेमी व काम करण्याची आवड असणाणारी व त्या कार्याला वाहून नेणारी हवी.

सुरवात करण्यापूर्वी आमच्या लहानपणी (म्हणजे ५ वी, ११ वी इयत्ता) दरवर्षी पावसाळयात वनमहोत्सव साजरा होत होता. आम्ही झाडे लावत होतो. बोरिवली, मुंबई मध्ये नॅशनल पार्क मध्ये जात होतो. हल्ली शाळेत असे उपक्रम आहेत कां ? सर्व जगभर वातावरण / पर्यावरण / प्रदुषण वाढत चालले आहे. भारतात प्रमाणे जास्त आहे. कारण आहे वाढती लोकसंख्या होय. लोकसंख्या वाढल्याने निवाऱ्यासाठी हळूहळू जागा कमी पडु लागली. त्यासाठी वृक्षतोड, जंगलतोड सुरू होऊ लागली. त्यामुळे पर्यावरण बिघडले. समुद्रात भर घालून तेथे पण जमीन वाढवून घेतली. पण त्यामुळे समुद्राच्या लाटांचे प्रमाण दुसरीकडे वळले व वाढत गेले. सरकारचे लोकसंख्येवर नियंत्रण नव्हते. त्यावर उपाय पण करत नव्हते. त्यामुळे वाढता वाढता वाढे भेदिले शून्य मंडळा या उक्तीप्रमाणे पाण्याची कमतरता भासू लागली. साठवण्याची क्षमता वाढवली नाही. ती तेवढीच होती. नवे तलाव नाही त्यामुळे पाणी अडवले जात नव्हते. नद्यावर धरणे बांधली नाहीत. उत्तर व दक्षिणेच्या नद्या जोडण्याचा कार्यक्रम बारगळला. पंचवार्षिक योजना फक्त कागदावर राहिल्या. लोकांना पाण्याचा दुष्काळ भासु लागला. पाण्याचे वाटप बरोबर होत नव्हते पाणी कमी पडल्याने पाण्याचा उपसा बोअरवेल करून होत होता. नद्यामध्ये कारखान्यांचा नको असणारा कचरा/रसायन मिश्रीत पाणी जाऊ लागले. त्यामुळे नद्या प्रदूषित झाल्या. पवित्र गंगा पण त्यातून सुटली नाही. किती दुर्दैव आपल्या देशाचे.

जंगल तोड व सिमेंटचे जंगल उभारून हवेतील प्राणवायुचे प्रमाण कमी होत चालले व ओझोनचे

प्रमाण वाढले की, जे घातक आहे. कारखान्यातून येणार धूर आकाशात सोडून प्राणवायु घटला व वातावरण बिघडले. मानवाला स्वच्छ हवा मिळत नव्हती. आजारपण वाढत चालले.
अवकाशात सोडली गेलेली याने व त्यामुळे चंद्रावर/मंगळावर होणारे आक्रमण झाले हे कशासाठी, हा निसर्गाला का त्रास दिला गेला, त्या ऐवजी गरिबांवर खर्च करावा व माणसाला सुखाने जगु द्यावे.

माणसांनी प्रगती केली, हे जरी खरे असले तरी त्याचा उपयोग बरोबर होत नाही. पृथ्वीमधील खाणीतून खनिजे काढणे. त्यामुळे होणारे भुकंप मानव टाळु शकला कां ? समुद्रातील प्रदूषण कमी झाले नाही. शेतीच्या बाबतीत तर सेंद्रीय खते, किटकनाशके घालून, नैसर्गिक धान्य न मिळता तसे धान्य खावे लागत आहे. उत्पादन भरपूर वाढले पण गुणवत्ता आणि मालाची प्रत खालावली. बिगर शेती करून शेतकऱ्यांना पैसा दिलात पण सिमेंटचे जंगल उभारून कितीपट कमावले याचा हिशोब लावा. शेतकरी गरीब तो गरीबच राहिला. क्षणभराचा फायदा त्यांना झाला खरा पण कायमचे दुःख त्यांना मिळाले.

जंगलातील वणवे नैसर्गिक होते का लावले गेले ? जमीन बळकावण्यासाठी तर तसे केले नसेल. अग्निचा वापर विध्वंस करण्यासाठी केला गेला.

विज कमी पडल्याने सौर उर्जाची गरज भासू लागली. हे चांगले झाले. वीजेची बचत झाली. हा शोध मानवाच्या खराखुरा उपयोगी पडला. अणुशक्तीने वीज निर्मितीपण होऊ लागली. पवनचक्क्या बांधून वायूचा उपयोग वीज निर्माण करण्यास सुरू केले आहे. शेतकऱ्यांचे पाण्याचे पंप त्यावर चालत आहेत.

निसर्गानी मानवाला पंचमहाभूताची देणगी दिली आहे खरी, पण त्याचा वापर कसा व कितपत करावा हे त्या मानवाला कळलेच नाही. त्या शक्तीचा दुरूपयोग होऊ लागला. अती वापर केल्याने त्या पंचमहाभूतांकडून मानवाचा संहार तर होणार नाही ना याची मनात भिती आहे. त्यामुळे सर्व जगभर वातावरणातील बदल दिसू लागला आहे. त्सुनामी सारखी वादळे येणे, समुद्र खवळणे, भूकंप होणे, हवामानातील बदल जसे की गरमी व थंडीचे प्रमाण तसेच अनपेक्षित अती पाऊस पडणे ही सर्व उदाहरणे त्याचीच आहेत.

२ वर्षापूर्वी आलेला कोरोना व नंतर आलेला ओमिक्रॉन ही त्याचीच उदाहरणे असु शकतील कां ? या सर्व गोष्टी आपल्याला थांबवावयाच्या असतील तर आपल्या सारख्या संस्थांनी पुढे येउन काम करत रहावे. हे कार्य सोपे नाही पण कठीण पण नाही. आपली संस्था प्रयत्नशील आहे.

हयासाठी प्रथम शाळेतील मुलांमध्ये जाऊन निसर्गाचे महत्व पटवून द्यावे. पाठ्यपुस्तकांत एक धडा निसर्गावर असावा. पंचमहाभूताचे महत्व त्यात समजावून द्यावे. वनमहोत्सव करावे, आवड निर्माण करावी. संस्थेच्या सदस्यांनी शाळेत जाऊन निसर्गावर भाषणे द्यावीत, संमेलने भरवावीत, असे केल्याने त्यांच्यात आवड उत्पन्न होईल. निसर्गावर मानव कशी मात करून संहार करत आहे, हे पण पटवून व दाखवून द्यावे. दृक श्राव्य, ध्वनी चित्रफिती इ. आधुनिक तंत्राचा वापर शाळेतील मुलांवर केल्यास निश्चित फायदा होईल. स्वच्छता राखणे, प्लॅस्टीकचा उपयोग न करणे व ते किती अपायकारक आहे हे त्यांना पटवून देणे. स्वच्छता राखल्याने आरोग्याला किती लाभदायक आहे हे समजावणे, हवा किंवा वातावरण स्वच्छ नसेल तर रोगराई / महामारी कशी वाढते हे त्यांना पटवून द्यावे.

‘तुम्ही जगा व प्राणीमात्रांना सुखाने जगु द्या ’
‘निसर्गावर प्रेम करा व वाचवा, तो तुम्हाला वाचवेल ’
‘ चांगल्या दृष्टीच्या मार्गाने गेलात तर सृष्टी निश्चितच चांगली राहील’
‘आपल्या संस्थेला हार्दिक शुभेच्छा’ आणि
‘आपण करीत असलेल्या कार्याला सुयश लाभो.’

****




डॉ. अरूण लोवलेकर
बावधन, पुणे
मोबा. ७७५८०७२९८१

# ७ सृष्टीमाता

सृष्टी हमे पैदा करती है, पालती है, पोसती है । अंत में हमे समेट भी लेती है । सृष्टी एक विशालतम भवन है, जिसमें हम रहते है । हम विशाल भवन का पूर्वउपाय करना हमारे लिए अति आवश्यक है । इसको हमे सजा कर रखना है । खराब हो गये इसके अंग को ठीक करने हेतू लगातार उपाय करना है । सत् चित् आनंद का 'सत्' ही सत्ता है । ब्रह्म की सत्ता संपूर्ण ब्रह्मांड पर है, थी और आगे भी रहेगी । ब्रह्म और माया मिलकर सृष्टी की रचना करते है । कामना का नाम माथा है । कामना ही मनुष्य को पराधीन बनाती है । पुरूष बुध्दि प्रधान होता है, स्त्री माया प्रधान याने कामना प्रधान होती है । सृष्टी के विरूध्द जो भी कार्य करेगा वह कभी भी मानव कल्याणकारी नही हो सकता है । आरामदायक जीवन जीने के लिये विज्ञान 'प्रगति' करता है । वह प्रगति नही 'अवनति' है । सृष्टी पुल्लींगी होती तो बात कुछ और होती, सृष्टी स्त्रीलिंगी है । किसीने उसे नुकसान पहुँचाया कि सृष्टी उससे बदला लेती है । और वह भी चक्रवर्ती ब्याज समेत बदला लेती है । प्रकृति यानी सृष्टी को कभी भी बदला नही जा सकता है । सृष्टी को कभी भी बदला नही जा सकता है । सृष्टी जैसे पहले थी वैसे ही रहेगी । सभी युगों मे वह एक जैसे रहती है ।

सृष्टी को ब्रह्मा और माया ही बदल सकते है और कोई नही बदल सकता है । ज्ञान और विज्ञान दो शब्द है । ज्ञान कभी भी नही बदलता है । विज्ञान का आधार प्रयोगशाला है । भिन्न भिन्न प्रयोगों के अनुसार विज्ञान के नियम बदलते रहते है । सृष्टी के नियम कठोर है । भावी पिढी की तकदीर आपके हाथों में है । आप की भावी पिढी की तकदीर आपके हाथों में है । आप भावी पीढी को सुखी ओर समृध्द चाहते है तो आपकी सृष्टीमार्ग के अनुसार ही चलना होगा । अभी भी मनमानी आपने की तो उसकी किमत आपको और आपकी भावी पिढी को चुकानी पडेगी ।

वर्तमान में हमारी सबसे बडी जिम्मेदारी है, प्रकृति 'सृष्टी' का संतुलन बनाये रखने के लिये प्रयत्नशील रहना है । यह समय विज्ञानकी प्रगती के दुष्परिणामों को देखने का नही है । कुछ कर गुजरने का है । किसी के भी झांसे में न आकर 'सृष्टीमार्ग' पर चलो । जो करना है अभी करना है । इसका बहुत महत्व है, आपका जो भूतकाल, भविष्यकाल के याद करते हो । अभी का समय व्यर्थ जा रहा है । नष्ट हो रहा है । सृष्टी के नियमों का पालन अभी करो और सुखी रहो । सृष्टी माता है, सब ठीक करेगी ।

****



पं. बळवंत पुराणिक
मोबा. ९४०७२७८१३२
भोपाळ

## ८ एकांत

एकांत हया शब्दाचा नेमका अर्थ काय ? आपण नेहमी ऐकतो, म्हणतो, मान्य ही करतोय की मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे, म्हणजे त्याला समाज अर्थात सर्वासोबत, समूहात जगणे प्रिय आहे, म्हणजे असं बघा आधुनिक परंपरा सोडून दिल्यास, लक्षात येईल. आपल्याकडे एकत्र कुटुंबात राहण्याची पध्दत म्हणजे माणसे जोडणे, त्यांच्या आधाराने, सहवासाने सुख दुःख सहन करित दिवस घालवायचे तसेच समाजात वावरतांनाही तो लोक जोडतो ग्रुप – संघ बनवितो. मित्र परिवार वा खास मित्र, एखादा 'बेस्ट फ्रेंड' ठेवूनच दिवस कंठत असतो. त्याने त्याला सुरक्षा, आधार व आनंद ही मिळत असतो. असे आपण ढोबळ मानाने बघतच आलो आहे. म्हणजेच 'एकांत' याचा अर्थ एकटा वा एकाटपण नक्कीच नाही. पण अस असलं तरी आणि त्याच परिस्थितीत त्याला कधी तरी एकटयाच स्वातंत्र्य हवं असतं. स्वतःच परिक्षण करायला, गोष्टी चूक की बरोबर हयावर विचार मंथन करून निर्णय घ्यायला वा पुढील सर्व नियोजन करायाला त्याला हे आवश्यक वाटते.

जेव्हा कुठल्या गोष्टीचा अतिरेक होतो तेव्हा त्याच्या विरूध्द तत्व जन्म घेते आणि हीच ती वेळ आहे, जेव्हा एकांत हवासा वाटतो. आपण महिलांच्या दृष्टीनेच उदाहरण बघू या. समजा एखाद्या भगिनीचे तान्हे मूल आहे व ती संयुक्त परिवारात राहते. सर्वजण लहानग्याला घेतील, सांभाळतील सहज त्याचे संगोपन होत राहील. पण कधी तरी त्या महिलेस आपल्या बाळासोबत 'एकांत' हवा असतो. मोठेपणी म्हणा वा म्हातारपणी आपली हीच लहानगी मुले मोठी होऊन, मुलगा–मुलगी आपल्या सर्व नात्यांना सर्वतोपरीने जपत असली तरीही खास नात्यांना 'एकांत' हवा असतो. त्याला आपण 'एकटेपण' म्हणू शकत नाही. अगदी त्यातही नवरा – बायको 'दो तन एक प्राण ' म्हणत जगले तरी, प्रत्येकाला 'एकांत' हवा असतोच. 'म्हणजेच हा झाला 'लौकिक एकांत'.

मग असं आयुष्य घालवत असताना आणि हे जाणवत असताना की शेवटच्या श्वासापर्यंत अविरत असच चालणार. तरीही आपल्याला 'स्व' आणि 'सर्वज्ञ' चा शोध घेण्यासाठी 'एकांत' लागणारच. त्याची साधना, शोध हा सर्वासोबत नाही होऊ शकत. भक्ती होऊ

शकेल, सामूहिक उपासना, आराधना जप होईल. पण ‘ध्यान’ या पायरीपासून ‘एकांतवास’ च लागेल हा झाला आध्यात्मिक एकांतवास.

ह्या जगात लक्षपूर्वक बघितलं तर अस लक्षात येत – बरेच वेळा आपण सर्वांमध्ये असून ही एकांतात असल्यासारखे अनुभवतो. सर्वांमधे न रमता आपला स्वतंत्र काही तरी ध्यास चालू असतो आणि बरेच वेळा ठरवून एकांतवास घेतला तरी मनाने सारे जग फिरून येतो. हव्या असलेल्या सर्व गोष्टी अनुभवतो.

तेव्हा एकटेपण व एकांत हे वेगवेगळे आहेतच. शिवाय सर्वांमध्ये राहून एकटे अन् एकटे असून ही सर्वामध्ये राहून एकटे अन् एकटे असून ही सर्वांमध्ये असा अनुभव आणि दोन्ही आवश्यकच. सहवास व एकांतवास अगदी प्रपंचात ही अन् परिमार्थात् ही.

प्रपंचात, जीवन जगायला सुख दुःखात, नीतीनियम, कलागुण शिकण्यास वृध्दिंगत करण्यास, प्रेम–स्नेह मिळविण्यास, सहवास, जनसमुदाय, मित्रवृन्द, परिवार हवा. तसाच स्वपरिक्षण करण्यास, योग्य निर्णय क्षमता वाढविण्यास, नियोजन सुसंबध्द करण्यास एकांत हवा, हे झाले प्रपंचाचे, अन् परमार्थातात ही प्रथम सहवास हवा, कुणाचा ? तर चांगले वक्ते ऐकणे, प्रवचन, ज्ञान, कीर्तन आदि गोष्टींनी ज्ञान वाढेल, स्वउध्दराचा मार्ग, गुरू पथ प्रदर्शक, सापडतील. मात्र मार्ग निश्चित झाला की ईश्वरापर्यंत पोचण्यासाठी व स्व–उध्दारासाठी एकांतवास लागेलच. अगदी प्रथम सांगितल्याप्रमाणे पति–पत्नी सुध्दा लौकिकातील दोन ईश्वरी अंश आपापल्या मार्गे व प्रयत्नानेच ते साध्य गाठतील. हे सत्य, हेच सत्य !

****

**संध्या भालेराव**
बावधन, पुणे
९८२०१३०९८२



## ९. वर्ष २०२१-२२ या कालावधीत झालेले संस्थेचे अनेकविध उपक्रम

### (१) प्रबोधन व पर्यावरण जागृती कार्यक्रम :

गुलाब कट्टा : दि. १८ एप्रिल रविवार रोजी संध्याकाळी ५ वाजता ऑनलाईन 'गुलाब कट्टा' कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला होता. प्रथम सौ. चारूलता पुराणकर यांनी आपल्या निवेदनातून, संस्थेच्या कार्यक्रमाची माहिती दिली व संस्थेची प्रार्थना शरयू पुराणकर यांनी म्हटली. श्री. अरूण पुराणिक यांनी आपल्या भाषणांत नव वर्षाची एक नव संकल्पना मांडली, ते म्हणाले की, राजा विक्रम शक, तसेच निरनिराळया धर्मानी आपल्या नावाचे जगभर नवनवे संवत सुरू आहेत. त्यातून त्यांचा काळ होऊन किती वर्षे झाली हे माहिती पडते. आज माणसाने खूप प्रगती केली आहे. अगदी वणवण भटकणारा आता आकाशात मंगळावर जाण्याची तयारी करीत आहे. पण त्याच्या या प्रगतीला किती वर्षे झाली हे सांगितले जात नाही. हे संपूर्ण मानवजातीचे संवत असेल, याला उत्तर वनवासी संवत म्हणावे, याला आजमितीला १४0२१ वर्षे पूर्ण झाली आहेत. हे वर्ष सृष्टीमार्गाने साजरे करून संपूर्ण जगाला याचे महत्व सांगते असे नमूद केले.

श्री. उल्हासराव पुराणकरांनी नॅनो टेक्नॉलॉजी बद्दल अत्यंत, रोचक व महत्वपूर्ण माहिती देऊन याचे पर्यावरण संरक्षणात पण मदत होईल हे नमूद केले. श्री. विनायक अभ्यंकर यांनी शिवकालीन पर्यावरण या विषयावर प्रकाश टाकला व त्याकाळी ही वृक्ष वनस्पतींना किती जपायचे हे आपल्या रोचक वाणीतून सांगितले. श्री. वसंतराव देशपांडे यांनी 'पर्यावरण – सामूहिक जबाबदारी व नाबार्डची भूमिका' या विषयावर उद्‌बोधन केले. नंतर श्री. प्रसाद पेटारे, चार्टर्ड अकाउंटंट यांनी संस्थेचे अकाउंट लिहणे या विषयावर माहितीपूर्ण उद्‌बोधन केले. ८0जी व सीएसआर फंड यांवर ही त्यांनी प्रकाश टाकला. श्री. बळवंत पुराणिक यांनी नर्मदा नदी बद्दल भरपूर नवी माहिती विशेषतः सांगितली. श्री. तुषार पुराणकर यांनी हा कार्यक्रम संपूर्ण ऑनलाईन दाखविण्यात आपली टेक्नीकल मदत केली. उत्तम सूत्रसंचालन करून चारूलता यांनी आभार मानले व कार्यक्रम समाप्त झाला.

### (२) व्याख्यान : समूपदेशन आणि ताण नियोजन

करोना महामारीच्या काळात कार्यकर्ते, सभासद तसेच सामान्य जनतेत नैराश्य व मरगळ आली आहे. ती मरगळ झटकून संस्थेच्या कार्यास सिध्द होण्याची गरज आहे. दिनांक ०९ मे २०२१

रोजी संध्याकाळी हा ऑनलाईन व्याख्यानाचा कार्यक्रम संस्थेतर्फे मातृदिनाचे औचित्य साधून करण्यात आला. व्याख्यात्या होत्या सोमय्या कॉलेज अंधेरी मुंबई येथील ॲकेडेमिक कौन्सेलर श्रुती पेटारे यांनी दिलेले उद्बोधनपर व्याख्यान, प्रश्नोत्तराचा काळ हे साधारण दोन तासात संपले. संध्याकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत कार्यक्रम झाला. ताण तणावाचे नियोजन हा सर्वाच्याच जिव्हाळयाचा असल्याने ७० पेक्षा जास्त लोक ऑनलाईन व प्रत्यक्ष असल्याचे दिसत होते. त्याशिवाय त्यांच्या घरचे कुटुंबातील लोक मिळून साधारण २००/२५० लोकांना या व्याख्यानाचा फायदा झाला असे म्हणण्यास हरकत नाही. वेळ मर्यादित असल्याने काही लोकांनाच प्रश्न विचारता आले. त्यामुळे अनेकांना आणखीनच फायदा झाला. त्यानी चार्टव्दारे म्हणजे 'पॉवर पॉईंट' प्रेझेंटेशनव्दारे संपूर्ण व्याख्यानाचा विषय समजून सांगितला, त्यामुळे विषय समजण्यास सुलभ झाला.

सदरचे व्याख्यान कार्यकर्त्यांसाठी प्रेरणात्मक ठरले असून सर्व श्रोत्यांनी कार्यक्रमाची प्रशंसा केली व प्रतिक्रिया मध्ये ही लिहले आता कार्यक्रम युटयूबवर पाहण्यास उपलब्ध आहे.

(३) बाल संस्कार वर्ग समापन :

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील बाल संस्कार वर्ग संस्थेव्दारा घेण्यात आले. हे वर्ग सोमवार दिनांक २६ एप्रिल रोजी सुरू झाले व सोमवार दिनांक १० मे २०२१ रोजी वर्ग परीक्षा घेण्यात आली. पूर्वी ठरवलेल्या अभ्यासक्रमानुसार श्लोक, स्तोत्र, मराठी महिने, तिथी, नक्षत्र, ऋतु हे शिकवुन मुलांकडून पाठ करवून घेतले. याशिवाय पर्यावरणाविषयी माहिती, हवा,पाणी, शुध्दतेचे माप, व्यायामाचे महत्व, प्राचीन भारताच्या गोष्टी सृष्टीमार्ग संस्थेचे विचार इत्यादी शिकविण्यात आले. सौ. शुभांगी महाशब्दे व डॉ. सौ. शरयू पुराणकर यांनी हे वर्ग उत्तम प्रकारे घेतले संचालित केले.

शेवटी परीक्षक म्हणून सौ. चित्रा पेटारे व सौ. संध्या घोटेकर यांना आमंत्रित केले होते. एकूण पंधरा मुलांनी नाव नोंदणी केली. ऑनलाईन वर्ग घेण्याची ही पहिलीच वेळ होती म्हणून पंधरा मुलानंतर नांव नोंदणी बंद केली. संस्कार वर्गाचा लाभ होत असल्याचे मुलांच्या पालकांनी फोनवरून कळविले आहे.

(४) निसर्ग विषयांवर – कविंचे कविसंमेलन :

सृष्टीमार्ग संस्थेने पांच जून हा जागतिक पर्यावरण दिवस वेगळया तऱ्हेने पहिल्यांदा खूप उत्साहात साजरा केला. हा कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत दूरदृश्य प्रणाली व्दारे

केला गेला. संस्थेमध्ये नऊ कवि आहेत. हे या कविंच्या कवितांचा आस्वाद 'निसर्गवाणी' या पत्रिकेव्दारे सर्व वाचक घेत असतातच. यावेळी सर्व कविंना एकत्र एक व्यासपीठावर आणून ज्ञान आणि मनोरंजन उद्देशाने हे आयोजन करण्यांत आले होते. यात ५ महिला कवियत्री सह एकूण आठ कवींनी भाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती संध्या भालेराव या संस्थेच्या कार्यकारीणी सदस्य व कवयित्री यांनी उत्तम प्रकारे पार पाडलें. कवितांचा विषय निसर्ग, निसर्गाची दुर्दशा त्यामुळे प्रदूषण व रोगराई सद्य परिस्थितीवर व्यंगात्मक टीका, असा विषय कवितांचा होता. त्याला हास्यव्यंगाची झालर असल्याने कार्यक्रम खूपच रोचक झाला. या कार्यक्रमाला ७५ पेक्षा जास्त कुटुंबांनी पाहिले. कार्यक्रमातून संस्थेचा निसर्ग प्रबोधनाचे कार्य पूरेपूर पार पडले. या कार्यक्रमात डॉ. अरूण लोवलेकर, उदय दाणी, उमेश गोखले, सुश्री शोभा पांडे, संध्या भालेराव, प्रतिभा देशपांडे (भोपाळ), विद्या निर्गुडकर, बैतूल, म.प्र. आणि ऋचा नांदुरकर, भोपाळ या आठ जणांनी भाग घेतला, झूम ॲपव्दारे हा कार्यक्रम प्रसारीत करण्यात आला.

(५) जागतिक योग दिवस

२१ जून २०२१ हा जागतिक योग दिनानिमित्त संस्थेत एक कार्यक्रम संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत आभासी/दूरदृश्य प्रणालीव्दारे करण्यात आला. सृष्टीमार्ग संस्था,  बावधन शाखेचे उपाध्यक्ष योगसाधक श्री. उदयजी दाणी यांचे मार्गदर्शन या कार्यक्रमाला लाभले. त्यांनी कार्यक्रमात, यम, नियम, आसन, ध्यान धारणा या अष्टांगाबद्दल क्रमवार विस्तृत माहिती दिली. प्रात्यक्षिके त्यांच्या एका शिष्याने करून दाखविली. याशिवाय विविध आजार व त्यावर उपयोगी आसन याबद्दल ही प्रात्यक्षिकासह दाखविण्यात आले. प्राणायामाबद्दल श्री. दाणीजींनी खूप छान माहिती अतिशय बारकाव्यासह सांगितली. अशी माहिती संभवतः दूरदर्शन व इतरत्र सहज उपलबध नसते. त्यांनी सर्व प्रेक्षकांना ध्यान करायला सांगितले व करवून घेतले. नंतर त्यांनी प्रेक्षकांना प्रश्न विचारायला सांगितले व त्यांचे समर्पक उत्तरे त्यांनी दिली. योग हा आजकाल नित्योपयोगी असा जीवनपध्दतीतील बदल सर्वांच्याच आयुष्यात, या महासंकटाच्या काळात झाला आहे. त्यामुळे प्रेक्षकांची खूप चांगली उपस्थिती होती.

सभेचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. दत्तात्रय जोशी यांनी केले. तंत्रसहाय श्री. तुषार पुराणकर यांनी केले.

(६) गुरूपौर्णिमा

हा दिवस दिनांक २४ जुलै २०२१ शनिवारी साजरा करण्यांत आला. हा कृतज्ञता दिन आहे, कारण

गुरू हा समाजाचा प्रतिनिधी आहे व प्रत्येक व्यक्ति हा समाजाचा ऋणी असतो. करोनामुळे याही वर्षी हा दिवस ऑनलाईन साजरा करण्यात आला.

सर्व प्रथम अध्यक्ष अरूण पुराणिक व सौ. स्मृती पुराणिक यांनी महर्षि व्यास प्रतिमेला पुष्पहार व पुष्पांजली वाहिली. त्यावेळी कुमार ईशान महाशब्दे याने संस्थेची प्रार्थना 'जलाशये पतितं तोयं' ही म्हटली. श्री. अरूण पुराणिक यांनी सृष्टीमार्ग संस्था स्थापन करण्याची प्रेरणा कशी झाली. त्यावेळी हरीव्दारला भेटलेल्या शिवानंद स्वामींची भेट व त्यांनी सृष्टीमार्गाचे ज्ञान सांगितले त्यावर छोटेखानी व्याख्यान दिले. बावधन शाखा अध्यक्ष, श्री. उल्हासराव पुराणकरांनी यांनी संस्था करत असलेल्या कार्याची माहीती सांगितली व सभासदांचे कौतुक केले. नंतर अतिथी अध्यक्ष श्री. वसंतराव देशपांडे यांनी 'निसर्गवाणी' या संस्थेच्या पत्रिकेच्या उद्‌घाटन केले व वार्षिक अंक सर्वांग सुंदर असल्याचे म्हणाले. नंतर त्यांनी लेख व कवितांच्या पुरस्कृताचे निकाल सांगितले. लेखात श्री. विनायक अभ्यंकर, श्रीमती संध्या भालेराव व विद्या निर्गुडकर आणि कवितेत श्री. उदय दाणी, डॉ. अरूण लोवलेकर व उमेश गोखले यांची नावे जाहिर केली.

नंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरवात झाली. प्रथम ऋचा नांदुरकर यांच्या शिवस्तुतीने झाली, जी अत्यंत प्रभावी व वर्णनातीत होती, लहान मुलांनी उत्तम गीते सादर केली. सौ. शोभा पांडे यांचे 'निसर्गवाणी' अंकाबाबत संपादिका या नात्याने खूप कौतुक केले. त्यानंतर अनेक तरूण व जेष्ठांनी गाणी व कथन याचे कार्यक्रम झाले. सरते शेवटी प्रसिध्द शास्त्रीय गायक व गुरू पंडित बळवंत पुराणिक यांचे भजनाने सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. चारूलता पुराणकर यांनी उत्कृष्टरितीने केले. संपूर्ण तांत्रिक सहाय हे श्री. तुषार पुराणकर यांचे होते.

(७) वृक्षारोपण :

ग्राम प्रबोधिनी विद्यालय, सुदुंबरे, जिल्हा पुणे येथे शाळेच्या विस्तीर्ण मैदानावर हा कार्यक्रम रविवार दि. २९.०८.२०२१ या दिवशी लायन्स क्लब, निगडी च्या सहकार्याने उत्तम रितीने पार पडला. यांत विद्यालयाच्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी भरपूर मदत केली. करोना संसर्गाच्या भीतीने वृक्षारोपणासाठी खड्डे खणायला कामगार मिळत नव्हते म्हणून संस्थेच्या विनंती वरून विद्यालयाच्या एका शिक्षकाने जे.सी.बी. व्दारे खड्डे खणून घेतले. आदल्या दिवशीच देशी वृक्ष आणून खड्ड्याजवळ ठेवले होते. यात आंबा, फणस, जांभूळ, सीताफळ, रामुळ यासारखे फळवृक्ष

तसेच काळा कुडा, आवळा, उंबर, लोखंडी, काटेसावर, पळस, आपटा, सप्तपर्णी, पांगारा, रतन गुंज, मोह, कडूलिंब, पिंपळ, जंगली बदाम, वावळ व कवठ इ. वृक्षांचे रोपण करण्यात आले.

प्रथम लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. रामकृष्ण मंत्री यांनी रोप लावून या कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले नंतर श्री. अरूण पुराणिक, अध्यक्ष, सृष्टीमार्ग संस्था, श्री. वसंत देशपांडे, युवराज वगदे, योगेश महाशब्दे, पीयुष कुलकर्णी, श्री. सदानंद बुलबुले, आदित्य इ. कार्यकर्त्यांनी वृक्षारोपण केले. त्याचप्रमाणे श्री. गणेश भताने, श्री. मुंडे सर आणि अनेक विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. त्यानंतर एका हॉलमध्ये सर्वजण एकत्रित झाले व प्रथम विद्यालयाचे श्री. सुपे सर यांनी शाळेची माहिती व कार्यक्रम सांगितले, श्री. रामचंद्र मंत्री यांनी लायन्स क्लब तर्फे बोलले व श्री. अरूण पुराणिक यांनी सृष्टीमार्ग संस्थेची ओळख व ती राबवत असलेल्या उपक्रमाची माहिती सांगितली.
शेवटी अल्पोपहार आणि चहा झाला व कार्यक्रमाची सांगता झाली. सकाळी १० वा. सुरू झालेला कार्यक्रम दुपारी १२ वाजता संपला.

(८) वार्षिक सर्वसाधारण सभा २०२१ :
वर्ष २०२१ ची वार्षिक साधारण सभा दिनांक ५ सप्टेंबर २०२१ रोजी सायंकाळी ५ वाजता रविवारी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. यावर्षी संस्थेने वृक्षारोपण, ग्राम प्रबोधिनी शाळा, सुदुंबरे, जि. पुणे या शाळेच्या विशाल प्रांगणात केले होते. त्यावेळी तेथील प्रभारी शिक्षकांनी, वृक्षारोपण झालेल्या वृक्षांना उन्हाळयात जगविण्यासाठी पाण्याची व्यवस्था करायची विनंती केली. या ठिबक सिंचनाला दीड लाख रूपये खर्च अपेक्षित आहे. ८०जी मिळाल्यास या दृष्टीने प्रयत्न करण्याचे श्री. योगेश महाशब्दे यांनी इच्छा दर्शविली, जी सभेने मान्य केली.
सभेत चालु वर्ष आणि पुढील वर्षाचे अधिकृत जमा खर्च वाचून दाखविण्यात आला व तो मान्य करण्यात आला. बावधन शाखेचे योगदान हे संस्था कार्यात मोठे आहे. हे श्री. पुराणकर साहेबांनी नमूद केले. मागच्या वर्षाचे अतिथी अध्यक्ष श्री. वसंतरावांना सर्वांनी टाळयांच्या गजरात निरोप दिला व त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे कौतुकही करण्यात आले. पुढच्या वर्षी करता पं. बळवंत पुराणिक यांच्या शिफारसीनुसार सौ. डॉ. सुषमा दुराफे, भोपाळ यांना अतिथी अध्यक्ष बनविण्यात आले. त्यांनी आपल्या भाषणांत त्यांना निसर्गकार्याची आवड असल्याचे व ते काम भोपाळ येथे करणार असे सांगितले. श्री. अनंत दामले यांनी संस्थेची सभासद संख्या आणखी जास्त वाढविण्याचे सुचविले. अध्यक्ष श्री अरूण पुराणिक यांनी सर्वांचे आभार प्रकट केले व सभा संपली.

:(९) निशीगंध कट्टा :

दि. १0 ऑक्टोबर २0२1 रविवारी संध्याकाळी ५ वा. ऑनलाईन प्रणालीव्दारे झाला. अशा प्रकारे या प्रकारचा हा चौथा कार्यक्रम होता. या कार्यक्रमातून सृष्टीमार्ग विचारधारा आणि निसर्ग पर्यावरणाची स्थिती व इतर महत्वाच्या विषयावर जेष्ठ पदाधिकाऱ्यांनी सभासद व इतर श्रोत्यांचे प्रबोधन केले. या कार्यक्रमात प्रथम शारदीय नवरात्राचे अध्यात्मिक महत्व या विषयावर श्री. अरूण पुराणिक यांनी सृष्टीमार्गाचा दृष्टीकोन सांगितला. नंतर श्री. वसंतराव देशपांडे यांनी 'नारायणी नमोस्तुते' नवरात्रातील दुर्गादेवीची विविध रूपे या विषयावर अभ्यासपूर्ण रोचक माहिती दिली. नंतर 'अमृत महोत्सवी वर्ष व त्या अनुषंगाने जबाबदारी' या देशभक्तीपर विषयावर श्री. श्रीपाद पांडे यांनी आपले विचार प्रभावपूर्ण पध्दतीने श्रोत्यांसमोर मांडले. चौथी वक्ता सौ. संध्या घोटेकर यांनी ' श्रीमद्‌भगवत् गीता – एक विचार ' या विषयावर उत्तम प्रकारे विश्लेषणात्मक भाषण दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संध्या भालेराव यांनी उत्तमरीत्या केले. कार्यक्रमाचा तांत्रिक विभाग नेहमीप्रमाणेच श्री. तुषार पुराणकर यांनी उत्तम पध्दतीने सांभाळला. संस्था गीत संध्या भालेराव यांनी म्हटल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

(१0) विद्यार्थ्यांना फराळ वाटप आणि निसर्ग प्रबोधन :

२८ ऑक्टोबर २0२1 रोजी सृष्टीमार्ग संस्था, बावधन शाखेतर्फे गरीब विद्यार्थ्यांना दिवाळीचा फराळ देण्यात आला. एकूण शंभर विद्यार्थ्यांना फराळ वाटप करायचा होता पण करोनाची भीती अजून असल्याने संख्या कमी होती. हा कार्यक्रम पुणे महानगरपालिका, प्राथमिक शाळा, बावधन येथे झाला. शाळेत पुरेशी जागा नसल्याने, शाळेसमोर असलेल्या मंदिराच्या आत हा कार्यक्रम घेण्यात आला. अशा वेळी शाळेच्या अनेक शिक्षिका उपस्थित होत्या. या वेळी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्व सांगितले, त्यावेळी बावधन शाखेचे अध्यक्ष श्री. उल्हास पुराणकर, उपाध्यक्ष श्री. उदयजी दाणी, श्री. किरण कुलकर्णी यांनी मुलांना मार्गदर्शन केले. संस्थेच्या ट्रस्टी डॉ. शरयू पुराणकर यांनी फराळ वाटप केले. शिक्षिकांनी मुलांना निसर्ग पर्यावरण कार्यात भाग घ्यायला आवडेल असे सांगितले. एकंदर कार्यक्रमानंतर विद्यार्थी पण आनंदून गेले. एका शिक्षकाने सृष्टीमार्ग संस्थेच्या या उपक्रम राबविणाऱ्यांना धन्यवाद देवुन कार्यक्रमाची सांगता केली.

(११) पर्यावरणपूरक आकाश कंदील कार्यशाळा :

सृष्टीमार्ग, बावधन शाखेतर्फे दि. ३0 आणि ३1 ऑक्टोबर रोजी १२ वर्षे वयापर्यंतच्या लहान मुलामुलींसाठी दिवाळीसाठी आकाश कंदील निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात

एकूण १५ मुलांनी भाग घेतला. कतार देशातून सुध्दा एक रूजुता प्रतिनिधी या मुलीने भाग घेतला होता. या कार्यक्रमाचे संपूर्ण मार्गदर्शन, रसिका ठोंबरे मॅडम यांनी केले. त्यांनी खूप चांगल्या पध्दतीने मार्गदर्शन करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून आकाश कंदील बनवून घेतला. विद्यार्थी कंदील बनविण्यात खूपच मग्न झाले. या कार्यशाळेचे आयोजन अध्यक्ष श्री. उल्हासजी पुराणकर व डॉ. शरयू पुराणकर यांनी केले.

(१२) इ–कचरा संकलन :

गणतंत्र दिन म्हणजेच २६ जानेवारी २०२२ रोजी इ–कचरा संकलन करून पर्यावरण संरक्षण या उद्देशाने 'ई–यंत्रण' या नावाखाली पूर्णम इकोविजन आणि सेवादिप या दोन संस्थेच्या विद्यमाने, सृष्टीमार्ग संस्था ही यात सहभागी झाली. करोनाच्या संकटाच्या काळात, करोना नियमाचे पालन करून ई–वेस्ट कलेक्शनचे काम संस्थेच्या सध्याच्या ठिकाणी म्हणजे नक्षत्र अपार्टमेंट, विवेक नगर, आकुर्डी येथे करण्यात आले. यात साधारण २० लोकांनी सहभाग घेतला. प्रत्येकाने आपल्या सोबत, कांही इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रीक अनुपयोगी सामान आणले होते. यात लॅपटॉप, सी.पी.यु, प्रिंटर, इन्व्हर्टर, रेडिओ, मोबाईल, रिमोट, सी.डी, डीव्हीडी, स्पीकर, टॅब्लेट, इत्यादी वस्तू देणाऱ्यांनी आणल्या होत्या. हा कार्यक्रम सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत चालला. दुपारी २ ला 'ई–यंत्रण' ची मोठी गाडी आली व तीन पोते भरून सामान त्यांना देण्यात आले. लॅपटॉप सारखे नाजूक वस्तू हातातच ठेवल्या. व काळजीपूर्व साहित्य नेले. त्यांच्या अंदाजानुसार सृष्टीमार्ग संस्थेने केलेले योगदान, पिंपरी चिंचवड मध्ये सर्वात जास्त होते. ही संस्थेच्या कार्यकर्त्यांसाठी आनंदाची बातमी आहे. संस्थेतर्फे ई–यंत्रण कार्यक्रमाची व्हाटसअप मेसेज, पोस्टर व फ्लेक्स बॅनरव्दारे जनजागृती करत भरपूर जाहिरात करण्यात आली.

या कार्यक्रमाला स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे श्री. भास्कर रिकामे आणि श्री. विजय सातपुते पण येऊन भेट देवुन गेले.

(१३) जैवविविधता वर व्याख्यान :

दि. ५ फेब्रुवारी संध्याकाळी ५ ते ६.३० पर्यंत, श्री ब्रिजेश नामदेव, अतिथी ठिकाण शासकीय मोतीलाल विज्ञान महाविद्यालय, भोपाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

या ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन अतिथी अध्यक्षा श्रीमती डॉ. सुषमा दुराफे, भोपाळ यांनी केले. वक्ते श्री ब्रिजेश नामदेव हे पर्यावरण संबंधात मार्गदर्शन केले असून त्यांना याबाबत अनेक पुरस्कार

मिळाले आहेत असे श्रीमती सुषमा दुराफे यांनी वक्त्यांचा परिचय करून देतांना आपल्या भाषणात सांगितले.
श्री. नामदेव यांनी आपल्या भाषणात सांगितले की, प्रत्येक जीव प्रजाती मध्ये अनेक विविधता आहेत. या सर्व विविधता एकमेकांना पूरक असून ते पृथ्वीच्या अन्नचक्राचा भाग आहेत. जितक्या जास्त प्रजाती, प्राणी, जीवाणू वनस्पतीमध्ये असतील तितका तो भूभाग, नैसर्गिकदृष्टया संपन्न असतो. याचे उदाहरण देताना त्यांनी वनस्पती प्रजातीचे विविध प्रकार फुलांचे, झाडांचे, फूलपाखरांचे, हरीत, गायी, म्हशी, फळझाडे, जीव किटाणू यांचे अनेक प्रकार सांगितले.
जीवविविधता जपण्यासाठी त्यावर कार्य करणाऱ्या संस्था, चेन्नई, मुंबई व दिल्ली येथे आहेत हे सांगितले. भाषणांची सर्व श्रोत्यांनी प्रशंसा केली व कार्यक्रमाची समाप्ती झाली.

(१४) ८ वा वर्धापन दिन कार्यक्रम :

सृष्टीमार्ग संस्थेचा ८ वा वर्धापन दिन कार्यक्रम स्वातंत्र्यवीर सावरकर भवनातील कॅ. कदम सभागृहात, प्राधिकरण, निगडी, येथे दि. २० मार्च २०२२ रोजी रविवारी दुपारी ४ ते ७ या वेळेत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात श्री शिवशंकर तिवारी साहेब, उद्योजक व शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान असणारे आहेत. हे मुख्य अतिथी होते. या शिवाय श्री. भास्कर रिकामे साहेब, त्रिपाठीजी, प्रिन्सीपाल श्री. वागनू, माजी लष्कर अधिकारी, श्री. अजित शितोळे, सामाजिक कार्यकर्ते इ. मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्य वक्ते म्हणून श्री. वसंतराव देशपांडे, विश्वस्त ही उपस्थित होते.

प्रथम संस्थेची निसर्गदेवता शिवाची प्रार्थना ‘जलाशये पतितं तोयं ..... म्हणून झाल्यानंतर ऋचा नांदुरकरची गायलेली प्रार्थना ऐकविण्यात आली व कार्यक्रमाला सुरवात झाली.

अध्यक्ष श्री अरूण पुराणिक आणि संस्थेच्या विश्वस्तांचे स्वागत करण्यात आले. टाळयांच्या गजरात प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले. त्यांचा परिचय इंग्रजीत व मराठीत कुमारी पुजा नरवडे यांनी करून दिला व अध्यक्ष अरूण पुराणिक यांनी शाल व श्रीफळ देवुन मुख्य अतिथी श्री. तिवारी साहेबांचा सन्मान केला.
करोना काळांत वर्ष २०२१ मध्ये संस्थेचे दोन चांगले सन्माननीय कार्यकर्ते मृत्यू पावले. त्यांना प्रथम श्रध्दांजली एक मिनिट उभे राहून देण्यात आली. त्यानंतर श्री. तिवारी यांनी आपल्या प्रभावी भाषणातून रासायनिक प्रदूषणावर प्रकाश टाकला.

श्री. दत्तात्रय जोशी यांनी सृष्टीमार्ग संस्थेची ध्येयदृष्टी आणि अभियान – व्हिजन आणि मिशन या बद्दल माहिती सांगितली. यानंतर निमंत्रित पाहुण्यांचे स्वागत श्री. मृणाल सेन गुप्ता यांनी केला. यामध्ये श्री. भास्कर रिकामे, सावरकर मंडळ, श्री. त्रिपाठीजी, प्रिन्सिपाल, कांतीलाल खिंवसरा सेकंडरी स्कुल, थेरगाव, एम.एल. वागनू, माजी लष्करी अधिकारी, अजित शितोळे, सामाजिक कार्यकर्ते.

संस्थेचे विश्वस्त श्री. पंडित बळवंत पुराणिक यांना त्यांच्या प्रदिर्घ शास्त्रीय संगीताच्या कार्याबद्दल आर्ट ॲन्ड म्युझिक सोसायटीने ऑनररी डॉक्टरेटची पदवी बहाल केली. या निमित्ताने सृष्टीमार्ग संस्थेतर्फे त्यांचा शाल व श्रीफळ देवुन श्री. तिवारी साहेब यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. बावधन शाखेचे अध्यक्ष श्री उल्हास पुराणकर यांनी करोना काळात सुध्दा संस्थेने केलेल्या कामाचा आढावा घेऊन सांगितले.

नंतर बक्षीस वितरणाचा कार्यक्रम सुरू झाला. प्रथम पं. बळवंत पुराणिक यांच्या हस्ते श्री. श्रीपाद पांडे, डॉ. अरूण लवलेकर, उमेश गोखले, चारूलता पुराणकर, यांना सन्मानचिन्ह आणि प्रशंसापत्र देवुन गौरविण्यात आले.


यानंतर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरूण पुराणिक यांना संस्थेचा मागील आठ वर्षाचा संक्षिप्त आढावा घेतला व प्रगतीच्या प्रवासाचा उल्लेख केला. त्याचप्रमाणे त्यांनी सांगितले की वनविभागाने वृक्षारोपणांसाठी जमीन वापरण्याची संमती दिली आहे. आता तेथे मोठया प्रमाणावर वृक्षारोपण करणे अपेक्षित आहे. हे कार्य २०२२–२३ ते २०२६–२७ या चार वर्षात करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

यानंतर, सौ. शोभाताई पांडे, संध्याताई भालेराव, शुभांगी महाशब्दे, उदय दाणी, योगेश महाशब्दे, दत्तात्रय जोशी, तुषार पुराणकर तसेच डॉ. शरयू पुराणकर, प्रसाद पेटारे, बळवंत पुराणिक, वसंतराव देशपांडे, उल्हासराव पुराणकर, अरूण पुराणिक, युवराज वगदे यांना प्रबोधनात्मक भाषण इ. साठी सृष्टीमार्ग संस्थेतर्फे सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देण्यात आले. त्याचप्रमाणे विविध कार्यासाठी श्री. शिरीष कुलकर्णी, सौ. चित्रा पेटारे, संध्या घोटेकर, श्री. मृणाल सेनगुप्ता यांना सन्मानपत्र देवुन गौरविण्यात आले. सौ. श्रुती पेटारे यांना ताणतणावावर समुपदेशन तथा व्याख्यान दिल्याबद्दल संस्थेतर्फे सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य भाषण श्री. वसंतराव देशपांडे यांनी दिले. ग्लासगो समीट २०२१ या पर्यावरण विषयावर त्यांनी उत्तम भाषण करून प्रबोधन केले.

सौ. संध्या भालेराव व किर्ती कुलकर्णी यांनी मिळून सृष्टीमार्ग गीत गायीले. नंतर संध्या भालेराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शुभांगी महाशब्दे व डॉ. शरयू पुराणकर यांनी कले. अल्पोपहार आणि चहापानाचा आस्वाद घेतला. ****

# सृष्टीमार्ग संस्था, वर्धापन दिन २०२१-२२ ची क्षणचित्रे




सृष्टीमार्ग संस्थेतर्फे कोविड मधील
ताणतणावमुक्ती वर व्याख्यान
सौ. श्रुती पेटारे



सृष्टीमार्ग संस्था, बावधन तर्फे
आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा









सृष्टीमार्ग संस्था आणि लायन्स क्लब
संयुक्तपणे वृक्षारोपण



# क्षणचित्रे




बावधन शाखेतर्फे शाळेतील मुलांना दिवाळी निमित्त फराळ वाटप



सृष्टीमार्ग संस्था, आकुर्डी तर्फे ''इलेक्ट्रॉनिक वेस्ट'' मोठया प्रमाणात संकलन करून प्रमाणपत्र मिळविले





# क्षणचित्रे












वर्धापन दिनानिमित्त पर्यावरणाबाबत संबोधन करताना मुख्य अतिथी उद्योगपती मा. श्री. शिवशंकर तिवारी








वर्धापन दिनानिमित्त अतिथी मा. श्री. एम. एल. वागनु, सेवानिवृत्त लष्करी अधिकारी यांचा सन्मान करताना




वर्धापन दिनानिमित्त मुख्य वक्ते मा. श्री. वसंत देशपांडे पर्यावरणासंबंधी उद्‌बोधन करताना





वर्धापन दिनानिमित्त विश्वस्त पं. श्री. बळवंत पुराणिक यांना डॉक्टरेट उपाधी मिळाल्याबद्‌दल संस्थेतर्फे सन्मान करताना






स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे पदाधिकारी, अतिथी श्री. भास्कर रिकामे यांचा सन्मान करताना





# काव्यसुमनांजली

## १० प्रेमकविता

क्यो इतन आदत सी हो गई है
तुम्हारे साथ होने की,
के अब तुम्हारे बिना जीना मुश्किल लगता है ।
वो एहसास तुम साथ होने का जिंदगी में
विश्वास लाता है,
गर तुम साथ हो तो कुछ भी काम करनें का
हौसला देता है ।
तुमसे मेरी खुशियाँ दुगनी होती है,
और तुमसे मेरा गम आधा
हरपल मेरी आँखे तुमपर जमी है,
तुमसे मेरे जीवन का रिश्ता बांधा

तुम्हारी आवाज मुझे तुम्हारी ओर खिंचती है,
तुम्हारा मुलायम स्पर्श दिल को ठंडक देती है ।

जब दिल उदास होता है,
तुम्हारी आगोश मे आनेका मन करता है,
तुम भी मुझे कभी नाराज नही करते,
अपने हुनर से मेरा दिल बहला देते हो ।

तुम्हारे पास होनेसे मुझे कभी अकेलेपन का
एहसास नही होता,
तुमसे बातें करते करते वक्त कैसे गुजरता
इसका पता नही होता
याद है मुझे जब मैने पहली बार तुम्हे देखा था,
आँखो के रस्ते तुम सीधे मेरे दिल में बस गऐ थे ।

वो सुबह सुबह तुम्हारा मुझे नींद से जगाना
और देर रात तक मुझे सोने ना देना
दिनभर मेरे कानों में गुनगुनाना और
होठोंसे नजदीक लफ्जोंको सुनना ।

तुम्हारी जुदाई मै बरदाश्त नही कर सकता
तुम्हें खोने का ख्याल कभी सोच नही सकता
तुम्ही भूल नही सकता जब तक है साँस
तुम युँ ही हमेशा रहना मरे दिल के पास ।

प्रसाद दि. पेटारे
९८२०८ ११७२५



(इस कविता का शीर्षक है ‘मेरा मोबाईल’
कृपया कविता फिरसे पढे ।)

****

## ११. अमृत बन बरसा पानी

जून बीत गया, आधा बीता जुलाई
इन्द्र देव की कृपा ना हो पाई ।
धरती हो गई रूआई ।।
धरती के तन पर पडी बिबाई । (भेगा)
कराह रही उसकी तरूणाई ।।
धरती व्याकुल हुई जल पीने को ।
कोस रही मानव जाति को ।।
हाय ! उन निर्दयी लोगों को ।
क्यों काटा इस कदर पेडों को ।
आज तरस रही उन्ही की आँखे ।
बादलों की घटा देखने को ।।
अनुष्ठान कर रहे कुऐं के अन्दर ।
इन्द्रदेव को प्रसन्न करने आवाहन ।।

क्या इससे बादल बरसेंगे ?
अवनी की प्यास बुझा पाएंगे ?
मानव तुम अब भी चेत जाओ ।
वृक्षों को तुम भरपूर पेड लगाओ ।
हरियाली जब हर तरफ बढेगी ।
तभी शीतल बयार बहेगी ।।
संग मे वो अपने बादल लाएगी ।
यही अमृत रस बरसाएगी ।।
****

सौ. विद्या निर्गुडकर
बैतुल
मोबा. ८९८९२१४१९०



**With Best Compliments From**

# U. R.

Homoeo Pharmacy

yoUR Trusted Pharmacy Associate

Get yoUR medicines delivered at Home or Clinic*

**Tushar Rasal**

**Email Id : urhomoeopharmacy@gmail.com | Contact : +91-9922582228**
**Shop No. 1, Nivedita Garden, Opp. Ambavatika, Kondwa Bk. Pune - 411048**

## १२ सौदा जिंदगी का

चलो जिंदगी से सौदा करते है
पूरी नही तो, कम से कम
जिंदगी के कुछ पल का ही
उसे 'देश–रक्षक' की जिंदगी मांगते है ।

न बना पायी मुझे सैनिक,
तो उसका परिवार बना दे,
न बनाया उसके माता पिता,
तो भाई बहन ही बना दे ।

यह ऐश्वर्य मुझे लगता फिका,
जिस पर न हो, ताज देशभक्ती का,
आनी–जानी का ये फेरा जिंदगी का,
मन पर बोझ सा 'राष्ट्र–उपकार' का ।

तू ही बता कैसे उतारू मैं,
ऋण इस अपनी धरती माँ का,
कितनी ही बार देगी वह जन्म मुझे,
फिरभी रहुँगा अधूरा का अधूरा ।

– जय हिंद माता

****

संध्या भालेराव
९८२०१३०९८२




# सृष्टीमार्ग संस्था, आकुर्डी आणि बावधन

संस्थेच्या पुढील वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा !
सृष्टीची सेवा 'सृष्टीमार्ग संस्था' सदैव साधत राहो !
हीच शुभकामना

* शुभेच्छुक *

**संध्या भालेराव**
भ्रमणध्वनी : ९८२०१३०९८२

## १३ स्वर्ग सुख

हरित संपदा से परिपूर्ण,
यह भारत माता मेरी ।
फल, फूल, धन–धान्य से
उसने तुम्हारी गोदभरी ।
मत डाल हे इन्सान ।
उस पर तू नजर बुरी ।
रख ध्यान उसका सदैव,
गर कोप से उसकी नियत फिरी ...
देख बन जायेगा निःसंशय,
तिन लोक का भिखारी ।
उसके बिना न कर पायेगा
तू दान, मान किसी की माँग पूरी ।
वृक्षों पर है देचख पक्षियों की,
आनंदभरी किलकारी ।
आसमान से जब बरसता पानी,
झरनों की होती, कलकलाहट जारी ।

खेतों में श्रमिको की,
श्रम पराकाष्ठासह दिलदारी ।
प्रसन्नता एवं तृप्त लहर,
दौडती जन–हृदय में भारी ।
इनको तहस नहस कर,
क्या तू बनेगा, पाप का भागीदारी ।
न कर ऐसा ! ले ले तू
इसकी सुरक्षा संवर्धन की जिम्मेदारी ।
वसुंधरा खिल उठेगी,
हर क्षण जैसे, फुलों की क्यारी ।
क्या कमी रह जायेगी फिर,
स्वर्ग सुख तो यही होगी भारी ।

****


संध्या भालेराव
९८२०१३०९८२





# सृष्टीमार्ग संस्था, आकुर्डी आणि बावधन

संस्थेच्या पुढील वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा !

* शुभेच्छुक *

**रश्मी हेंडाऊ**
भ्रमणध्वनी : ९८२१०६८०१७

## १४. कागदाची होडी

ग्रीष्माच्या उकाडयासोबत हरवली सोबत करणारी सावली
रिमझिम श्रावणसरींनी मग झाली, तृषार्त मनेही ओली ।।
मृदगंध दरवळला आसमंतात, भूमीवर ओघळ लागले वाहू
चला करूया स्वागत सरींचे, अंगणात पसरूनी बाहू ।।
बरसत असतो जेंव्हा अविरत वाऱ्यासंगे बेभान
घराघरांमध्ये गप्पाना तेंव्हा, उरत नाही भान ।।
पाऊस असतो श्रीमंतांचा, तर असतो गरिबांचा एक
एकासाठी असते मौज ती, दुसऱ्याला प्रश्न अनेक ।।
श्रीमंत जेंव्हा घरात बसून घेतो, घोट होले होले
छतावर बसून कोणी तरी तेव्हा सावरीत असतो कौले ।।
शेतकऱ्यांसाठी येतो नेहमी पाऊस बनुनी देव
सरींच्या येण्यावर ठरते त्यांची वार्षिक देवघेव ।।
बालपणीची ओली आठवण मनी, भार होऊ लागते
नकळत मग कागदाची होडी, आकार घेऊ लागते ।।


उदय दाणी,
बावधन, पुणे
मोबा. ९८९०१५४५७८




****


# सृष्टीमार्ग संस्था, आकुर्डी आणि बावधन

संस्थेच्या पुढील वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा !



* शुभेच्छुक *

**श्री. अनंत (नाना) दामले**

भ्रमणध्वनी : ९८२२०२१६५१

## १५. अक्षय्य तृतीया

अक्षय्य तृतीया
आऽऽऽली आऽऽऽली
अक्षय्य तृतीया
आऽऽऽली

अक्षय्य तृतीया आली
अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने
विविध खरेदीची धांदल उडाली
उडाली उडाली
अक्षय्य तृतीया
आऽऽऽली आऽऽऽली
या शुभ मुहूर्ताला
गौर सजली, हळदीकुंकू रंगली
फराळाची ताटं भरली
भरली ऽऽऽ भरली ऽऽऽ
अक्षय्य तृतीया आली
आऽऽऽली
बळीराजाने बियाणे पेरली
शेतीमध्ये भरभराट झाली
धरणी मातेची पुजा केली
केली ऽऽऽ केली ऽऽऽ
अक्षय्य तृतीया आली
आऽऽऽली
अक्षय्य तृतीया आली

****



उमेश गोखले,
प्राधिकरण, निगडी
मोबा. ७८८७७१६७३७

सृष्टीमार्ग संस्था, आकुर्डी आणि बावधन
संस्थेच्या पुढील वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा !
* शुभेच्छुक *
डॉ. अरुण लोवलेकर
सौ. शोभना लोवलेकर
भ्रमणध्वनी : ९७६६३२०८०५ । ७७५८० ७२९८१

## १६. काले मेघा

काले काले मेघ छाए
आए मनचले बादल

छा गया अंधियारा चंहुओर
बयार करने लगी हलचल

घिर गई अब दसों दिशाएँ
स्तब्ध हुई सृष्टि सारी

लोटे पंछी घर को आए
शांत हुई खग किलकारी

धीरे धीरे लगी बरसने
बूँदे नथ से मतवाली

लेकर आई झोली भरकर
धरती की खुशियाँ सारी

भर गई संतोष की प्याली
हो चली नदियाँ दिवानी ।।

****

## १७. माटी का पुतला

ये माटी का पुतला एक दिन
माटी में मिल जाएगा
रोता रहता जीवन भर तू
एक दिन सबको रूलाएगा ।

समय पेड के पत्तों सा
पतझड में झड जाएगा
जान मोल घडी का वरना
नादान तू पछताएगा ।

व्यर्थ समय को अर्थ दे
जीवन धन्य कर जाएगा
इस माटी का ऋण चुका
शपथ ले वृक्ष लगाएगा ।

डोर साँसों की बंधी वृक्ष से
कुल को अपने बचाएगा
धरती माँ को दे सौगात
मरकर जीवन पाएगा ।।

****

सौ. ऋचा नांदुरकर, भोपाळ
(वैखरी)
मोबा. ९४३५९०५५८०



## १८. रिमझिमणारा पाऊस

पाऊस कसा रिमझिम रिमझिम रिमझिमतो ।
अन् सारा आसमंत रोमारोमात मोहरतो ।।
सूर्य काळ्या ढगांच्या दुलईतून मंद मंद हसतो ।
अन् चमचमत्या किरणांनी थेंबाथेंबाला शृंगारतो ।
झाडाची कोवळी कोवळी पाने खुदुखुदु हसतात ।
मोठी पाने मात्र मोठेपणाने थेंब थेंब झेलतात ।
सरीवर सरी वाऱ्याच्या तालावर फेर धरतात ।
अन् साचलेल्या पाण्यावर नक्षीदार रांगोळी रेखतात ।।
कौलारांना पाण्याच्या तुषारांनी सचैल स्नान घडते ।
तुकतुकीत रंगाने त्यांचे अंग अंग चमकते ।।
रस्ता देखील न्हाऊन माखून ताजातवाना होतो ।
काळया कुळकुळीत रंगावर चंदनाचे पट्टे रेखतो ।।
तो लाल पिवळा गुलमोहर डोल डोल डोलतो ।
हर्षभरीत होऊन मनातील बोल बोल बोलतो ।
रिमझिम पावसात मुल खेळतात बागडतात ।
मोठी माणसं ही त्यांच्या खेळात सहभागी होतात ।।
या अमृत करांनी आकाश पृथ्वीच्या जवळ जवळ येते ।
व चिंबचिंब होऊन धरती तृप्तीचा हुंकार देते ।।

****



**सौ. शोभा पांडे**
कोथरूड, पुणे
मोबा. ७७६९८८९६३८

-: With Best Compliments From :-

**SHRUSHATA HEALTH CARE PVT. LTD.**



**1. Diagnostic division Manufacturing / Exporter of all vitro diagnostic kits**
**2. Shrushata pathology lab Chain of lab**

**Corporate Office :**

Behind Collectorate Camp, 5th Bungalow, Paranjape Lay Out Camp, Amaravati - 444 602.
Customer Care : 93701 08010

# १९. रिक्त होणे .....

जीवनाची खरी कृतार्थता, रिक्त होण्यात असते
बंधनापेक्षाही खरे सुख, मुक्त होण्यात असते ।
निसर्गाचे गूढ रहस्य हेच सांगत असते ।
देण्यात असलेले समाधान, घेण्यात कधीच नसते
कोमल शुभ्र फुलांनी, हा पारिजात बहरतो ।
काही क्षणातच या धरतीला सारे सौंदर्य अर्पण करतो ।।
पण सर्व काही देऊन ही पानापानातून मोहरतो ।
रिक्त होण्याचे खरे सुख, भरभरून अनुभवतो ।
मधुर रसरसलेल्या फळांनी, तरू चहुबाजूने फुलतो ।
साऱ्या रानाचे राजेपण डौलात मिरवतो ।
पण फळाशिवाय ही वृक्षराज आम्रपर्णी आनंदगीत गातो ।
रिक्त होण्याचे खरे सुख, भरभरून अनुभवतो ।।
गर्भवती सम झळाळतो हा, काळा मेघ सतेज ।
जलभारे वाकलेला दिसे किती सुरेख ।।
अमृततुल्य वर्षावाने, जीवन तृप्त तृप्त करतो ।
रिक्त होण्याचे खरे सुख, भरभरून अनुभवतो ।।
विद्या द्यावी, धन द्यावे, संग्रही असेल ते ते द्यावे ।
जगी येतांना रिक्त येतो, जातानाही रिक्तच असावे ।
देता देता संपूर्ण मोकळे व्हावे,
रिक्त होण्याचे खरे सुख अनुभवावे ।

****



**सौ. शोभा पांडे**
कोथरूड, पुणे
मोबा. ७७६९८८९६३८

सदरच्या अंकासाठी आपल्या सर्व सभासदांनी आपले साहित्य/लिखाण पाठवुन प्रकाशनाच्या दृष्टीने प्रचंड प्रतिसाद दिलेला आहे, त्याबद्दल संस्था अत्यंत आभारी आहे.

**संपादक मंडळ**

# २०. निसर्गानुसार आचरण

आपण विदेशांत गेलो कि तिथलं सर्वच काही आपल्याला नवं वाटते आपण आश्चर्याने सर्व दूर न्याहाळत असतो. आजचे जीवन पण असंच, 'थ्रीलिंग' झालं आहे. मागच्या काही वर्षाशी तुलना केली तर जाणवतं, मोठे मोठे पूल व त्यावरून जमीन निहारणे, मेट्रोतून प्रवास, वेगळे कपडे, जेवण–खाणं, थ्रीडी व्हीडिओ, ई–बँकिंग आर्थिक व्यवहार, सगळंच चमत्कारी वाटते. आपण लहानपणच्या जीवनातून सध्याच्या आधुनिक जीवनांत प्रवेश केला आहे. आपल्या जीवन शैलीत खूप बदल झाला आहे. मात्र धकाधकीच्या आचरणामुळे शरीर प्रकृती, समाजसंबंध, निसर्ग परिसर यावर फार वाईट परिणाम झाला आहे. मात्र समाधानाची गोष्ट म्हणजे याची जाणीव वेगाने सर्वांना होत आहे. म्हणून संपन्न व शिक्षित लोकांसकट सर्व पर्यावरण प्रेमी मंडळी नैसर्गिक जीवनाकडे वळू लागले आहेत. हे निसर्गानुसार आचरण कसे असावे याचा विचार करून ते कसे व का असावे हे अभ्यासपूर्वक येथे देण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्या जिवाला जसे काम असते त्याला तसे साधन निसर्ग आपोआप त्याच्यात विकसित करतो. याला सृष्टीमार्ग विचारधारेनुसार ' कार्यानुरूप साधन' म्हणतात. 'Tool for the task' हे निसर्गाचे मूळ तत्व आहे. हे तत्व जीवनाच्या प्रत्येकास लागू पडते. निसर्गाने माणूस व प्रत्येक जीवांची शरीराची रचना फारच व्यवस्थित केली आहे. यामुळे तो आपले विचार, कार्य, पोषण, सुखसुविधा व वंशाची वाढ नीट करू शकतो. यासाठी शरीरात मेंदु, छाती, पोट, ओटीपोट व प्रजनन अंग दिले आहे. 'कार्यानुरूप साधन' अनुरूप, मेंदुचे काम हे या पांच महत्वाच्या अंगाचे, रक्षण, कार्य, पोषण, रखरखाव आणि वृध्दी याविषयी संचालन करणे आहे. म्हणून मेंदुच्या दृष्टीने, मेंदू या संपूर्ण विश्वास त्याच्या पाच भागात विभागुन विचार करतो. या व्यतिरिक्त त्याचे पंचेद्रिये व मेंदू विभागुन विचार करतो. त्यापलीकडे अनुभूती कार्य तो करू शकत नाही. उदा. अनंताची कल्पना, प्रकाशाच्या वेगाची अनुभूती, वस्तूंच्या म्हणजे जगाच्या खऱ्या रूपाची दृश्य त्याला पाहता येत नाही. अत्यंत कमी लहरीचे नाद तो ऐकू शकत नाही. म्हणून 'जग हे माया आहे' हे आदी शंकराचार्यांनी म्हटले आहे.

जीवनशैली निसर्गाचा अर्थातच शरीर यंत्राच्या चलनाच्या मूळ तत्वानुसार असायला हवी म्हणजे शरीरावर दुष्परिणाम होणार नाही. पण, निसर्गानुसार तर वनांत प्राणी, पशु, पक्षी राहतात मात्र, वन्यजीवन सोडून नागरीजीवनाची सवय असलेल्या माणसाला तसे आचरण करणे योग्य नाही व शक्य नाही. यासाठी सृष्टीउत्पत्तीच्या ज्या नियमानुसार निसर्ग चालतो त्यानुसार चालणे हे उत्तम जीवनशैलीला गरजेचे आहे आणि हा नियम आहे 'कार्यानुरूप साधन' 'Tool for the task'.

सृष्टीमार्ग संस्थेत, प्रत्येक सभासदाने त्यानुसार जीवन जगावे असे सांगितले आहे. ऋग्वेदात एक श्लोक

संस्थेचे ब्रीद वाक्य आहे. 'ऋतस्य धीतिर्वृजिनानि हन्ति ।' अर्थात परमसत्याचा सृष्टीउत्पत्तीचा निसर्गाचे पालन केल्यास शारिरीक आणि मानसिक दोषांचा नाश होतो. सृष्टीमार्ग ग्रंथात दिल्याप्रमाणे अशा या 'ऋता' एकंदर पांच आहेत.
ते असे आहेत

१. सतत संतुलन २. कार्यानुरूप साधन ३. निरंतर गतीशीलता
४. अवशेषांचे रूपांतरण ५. प्रजातीची नवनिर्मितीव्दारे वृध्दी

या पांच तत्वानुसार व स्वाभाविक पांच विभागानुसार तयार होणारी जीवनशैली निसर्गानुसार जीवनशैली आहे आणि ती सर्वोत्तम आहे. या अनुसार माणसाचे आचरण व दैनिक राहणीमान कसे असावे याचे उदाहरण येथे दिले आहे.

(१) सुरक्षा व संचालन संबंधी विचार : हे मेंदुविभागाचे कार्य आहे. विचार करताना खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१) या ऋता म्हणजे सृष्टीसृजनाचे पांच तत्व, हे सर्वकालीक व सर्व विश्वाला लागू पडतात म्हणून ते परमसत्य आहेत, यावर विश्वास ठेवणे.
२) या तत्वांना समजून घेणे
३) विश्वातील जीव शरीर व अनेक निसर्ग चक्रांमधील साम्यता आहे हे जाणून घेणे.
४) हे परमतत्व निसर्ग, अध्यात्म आणि विज्ञानांत आहे.
५) वन्यजीवन व आधुनिक जीवन पध्दतीत हे पांच तत्वानुसार आचरण करता येते.

(२) उद्यम : स्वाभाविक दुसरा विभाग आहे. छाती, हृदय आणि फुफ्फुस, कमाईची साधने पर्यावरणाला (प्रकृतीला) घातक नसावे. कमाईची साधने पर्यावरणपूरक असावीत. विसंगत नसावीत.

१) शेती : शेतात, बागेत नैसर्गिक खते आणि सेंद्रीय कीटकनाशके वापरावीत परंतु विदेशी वनस्पतीची लागवड करू नये.
२) पशुपालन : १. पशु हे माणसांप्रमाणे एक जीवंत प्राणी आहेत हे लक्षात ठेवून त्यांचा आहार विहार प्रेमपूर्वक द्यावा. २. त्यांना बंद ठेवू नये. त्यांना प्रजननाचा नैसर्गिक हक्क द्यावा. ३. त्यांचे शोषण करू नये, हिंसाचार करू नये.
३) वनोपज : १. ओल्या वृक्षांना तोडू नये. २. वन्यप्राण्यांची शिकार हौस म्हणून करू नये. ३. वनांतील शांतता भंग करू नये.
४) खणन उद्योग : १. उपलब्ध खनिजांचा पुर्नवापर करावा. २. खणन करू नये. ३. जमिनीतील पाण्यावर माणसाचा हक्क नाही. जमिनीतील पाणी हे वनस्पती आणि प्राणि यासाठी निसर्गाने वर्षभर राखून ठेवले आहे. ४. पहाड दऱ्याखोऱ्यांचे सपाटीकरण करू नये.

(३) आहार विहार :

१. आपल्या वंशांशी सुसंगत असणारे अनेक पिढयांनी खाल्लेले खाद्यपदार्थ खाण्याला प्राथमिकता द्यावी.

२. विशिष्ट ऋतुत उत्पन्न होणारे फळभाजी खाण्यांस प्राथमिकता द्यावी. ३. मीठ, साखर, तेल अति थंड व गरम हे कृत्रीम पदार्थ आहेत. त्यांचे अतिसेवन करू नये. ४. प्राण्यांना त्यांचे खाद्य द्यावे. दुसरे खाद्य खाण्याची सवय लावू नये. ५. रासायनिक पदार्थ टाकलेले अन्न खाणे टाळावे. ६. प्रत्येक मनुष्य आणि प्राणी याला वेळ काळानुसार शारिरीक श्रम झालेच पाहिजेत.

(४) आहार विहार : खाद्यवस्तू, खाण्याच्या सवयी, साधने इत्यादी, नैसर्गिक स्थळ, वेळ, काळ आणि ऋतुमान यांच्याशी शक्य तितक्या सुसंगत असाव्या.

वसाहत, घरे आणि सुविधा : घर आणि त्यातील सुविधा, रंग, वस्तू, निसर्गाशी जवळीक साधणारे, स्वास्थ्यास लाभदायक, प्रसन्न करणारे आणि कार्यक्षमता वाढविणारे असावे आणि

१. कृत्रिम उर्जेवर अवलंबून न राहणारे आवास असावे.

२. आवासांत, नैसर्गिक उर्जेचा वापर, सांडपाणी आणि कचरा यांचे पुर्नवापरासाठी नियोजनाची व्यवस्था असावी. ३. वनस्पतींच्या सानिध्यात आवास योजना असावी.

४. हवा, प्रकाश, आकाश, भूमि प्रदुषित करणाऱ्या साधनांचा शक्य तितका उपयोग टाळावा.

५. वनस्पती, शेती, पशुपक्षी यांचा अधिवास नष्ट करून घरे बांधू नयेत.

६. एका कुटूंबाला आपल्या हाताने नियमित साफ सफाई करता येईल एवढेच लहान घर असावे.

(५) कुटुंब आणि शिक्षण :

१. मूलबाळ नसलेल्यांनी केवळ मूल दत्तक घेण्याचा मार्ग धरावा. मूलाबाळांवर सृष्टीमार्गाचे संस्कार लहानपणापासून नियमित करावे.

२. आपल्या मुलांना निसर्ग शोषण आणि पर्यावरण प्रदुषणासंबंधी घातक प्रभावाविषयी लहानपणापासूनच संस्कार करावे.

३. सृष्टीमार्ग, सणवाराविषयी शिकवावे.

४. पृथ्वी वाचविण्याच्या श्रेष्ठ परमार्थ कार्याचा उत्साहाने प्रचार व प्रसार करावा.

५. मुल बाळ न होणाऱ्या दांपत्याने योग्य तो वैद्यकीय उपचार करावा. मात्र आधुनिक कृत्रिम उपाय करू नयेत.

६. नाईलाज असेल तर शेवटी कायदेशीर मूल दत्तक घ्यावे.

****



**अरूण पुराणिक**
संस्थापक अध्यक्ष
९०४९६ ८६३५०

# २१. पुरस्कार

गेले दोन दिवसांपासून किर्ती फारच खूष होती तिच्या प्रत्येक कृतीमधून उत्साह जाणवत होता आणि तिच्या खूषीचे कारणही तसेच होते. जवळ जवळ १५ ते १६ वर्षानी ती गावाकडे चालली होती. तिथे तिचे बालपण गेले होते. गावाकडे जी त्यांची जमीन होती ती विकायची होती म्हणून काही कागदपत्रावर तिची सही पाहिजे होती. किर्तीचे वडील गेले त्यावेळी एवढया संपत्तीची, जमिनीची कशी व्यवस्था होणार या कल्पनेने सर्वांच्या डोळयापुढे प्रश्नचिन्हे होती. तसे किर्तीच्या वडिलांनी मृत्यूपत्रात लिहील्या प्रमाणे जोपर्यंत काकांची इच्छा आहे तोपर्यंत त्यांना शेती करता येईलच. त्याबदल्यात जमीनीचा काही भाग काकाच्या नावावर तर काही भाग किर्तीच्या नावावर होता. आता सध्या तब्येत साथ देत नव्हती, मुलही परदेशात स्थित झाली होती आणि सुखवस्तू म्हणण्यासारखी त्यांची परिस्थिती होती आणि मुलांचा आग्रह होता की आता आराम करावा आणि काही दिवस परदेशात मुलांचा पाहुणचार घ्यावा म्हणूनच काकांनी जमीन विकण्याचा निर्णय घेतला. किर्तीचे सुध्दा सासरच्या व्यापामुळे गावाकडे दुर्लक्ष होत होते आणि गावाकडे रहाण्याची कोणाचीही इच्छा नव्हती. म्हणूनच तिच्या वाटणीचा भागही काकांबरोबरच कॉन्ट्रॅक्टरला द्यायचं ठरवून ती गावाकडे आली. किर्तीने कागदपत्रांची पुर्तता केली आणि मोकळा श्वास घेत ४–५ दिवस निवांत राहण्याचे ठरविले. खरं तर गावात आल्यापासुन तिला लहानपणाचे मित्र–मैत्रिणी शेजाराचे, वाडयातले, वाडयातील भावंड हयांच्याबरोबर घालवलेले दिवस सुखद आठवणी सर्व आठवत होते. एवढया मोठया वाडयात ती आणि चुलत भावंड खेळताना दिसत होते. वाडयात दोन–चार गरजू बिऱ्हाडे होती. ती माणसे, त्यांची मुले, मुली सर्वजण करा एकत्र काळ घालवत होतो आणि खरं सांगू आई–वडील ही मुलांना मोकळीक देत होते, अभ्यासाचे बंधनही कमी होती. म्हणून आम्ही अभ्यास करत नव्हतो असे नाही. त्याकाळी आई–बाबांपेक्षा शिक्षकांचा धाकही असायचा आणि त्यांचे प्रेम ही खुप असायचे विद्यार्थ्यावर, अभ्यासासाठी त्यांचा मारही खाल्ला तरी काही वाटत नव्हते. शिक्षक इतके मनापासून शिकवत होते. अगदी एखादे गणित किंवा शास्त्रीय संकल्पना डोक्यात बसेपर्यंत आम्ही किती मार खात असू याची कुठेच गणती नसायची.

कुठलाही सण असो,वाडयात वेगळाच उत्साह असायचा. त्या दिवशी जे गोडाधोडाचे पदार्थ प्रत्येक घरात शिजत असे त्याची चव सर्वांना मिळत असे. सण नवे कपडे, मे महिन्याची सुटट्री, त्यावेळी रंगलेले पत्त्याचे डाव, वाडयात कुणाकडेही पाहुणा आला तरी ते सर्व वाडयाचे पाहुणे असत इतके निकोप आणि निर्भेळ वातावरणात मी वाढले हयाचा मला फार अभिमान आहे आणि अजुनही मी माझे लहानपण व घालवलेला तो सुवर्णकाळ सांगताना अगदी तल्लीन होउन जाते.

आता गावातून येताना, वाड्याचे स्वरूप बदलून मोठमोठ्या बिल्डिंग झाल्याचे पाहून नकळत मन खट्टू झाले. आपल्या काळातील कुणी दिसते का हयासाठी माझी नजर भिरभिरत राहिली.

कोर्ट कचेरी, कागदपत्रे सहीचे काम झाले, मनातून वाईट वाटत होते की आता हयानंतर वाडयाशी काहीही संबंध राहणार नाही. कोण जाणे परत कधी यायला मिळेल न मिळेल म्हणून हया भेटीत२–३ दिवस राहायचे ठरवले. दुस–या दिवशी सकाळी उठले शाळेच्या तिकडे आणि गावाबाहेर फिरण्याचे ठरवत होते. आवरता आवरता शाळेत जाण्यासाठी आई माझ्या वेण्या घालायची आणि दिवस बांधूनही लगेच त्या वेण्या वरती बांधून टाकीत असे, मग मी तिला खूप त्रास देत होते. शाळेत वेळेवर जाण्यासाठी एकतरी धपाटा बसत असे त्याशिवाय माझी शाळा सुरू होत नव्हती. त्या रम्य आठवणीत बाहेर पडतच होते, शाळेकडे जाण्याचे मातीचे रस्ते संपून डांबरी रस्ते दिसत होते.खूप वर्षानी आल्यामुळे आणि सर्वत्र इमारतीचे जाळे झाल्यामुळे शाळा खूप लांब लांब वाटत होती. बऱ्याच इमारतींवर मुंदडाशेठ आणि त्यांचा ट्रेडमार्क असलेला लोगो दिसत होता आता वाटले गावाचा कायापालट व्हायला नवीन कंपन्या तसेच मुंदडाशेठ यांचा फार मोठा हात असावा. जसा मार्ग फुटेल तशी मी चालत होते. प्रत्येक गल्लीची मनातील वेगवेगळी जागा होती तिथल्या मित्र मैत्रिणी अनेक होत्या त्यांची वेगवेगळी आठवणींबरोबर चालत होते. तेवढयात मागून किर्ती म्हणून कोणी बोलवत होते. मागे वळून पाहिले तर माझ्याच बेंचवर बसणारी कल्पना असावी असे वाटले व जवळ आल्यावर अंदाज खरा ठरला आणि मला खूप आनंद झाला. तिला माझ्या येण्याचे कारण सांगितले तशी ती नाराज झाल्याचे जाणवले आम्ही दोघी शाळेकडे निघालो तसे मी तिला विचारले हे काय ग सगळे गाव काय मुंदडा शेठने विकत घेतले की काय ? जवळ जवळ ५० ते ६० टक्के बिल्डिंग त्यांच्याच आहेत ती हो म्हणाली अग पण ते आता खूप वयस्कर झाले असतील ना ? इथेच असतात का कुठे गेलेत तर कल्पना म्हणाली सध्या ते दोन पैकी कुठल्यातरी मुलाकडे आलटून पालटून राहतात असे ऐकले आहे.

मध्यंतरी चला खेडेगावात हया योजने अंतर्गत, गावात खूप लहान मोठया कंपन्या आल्या प्रथम त्यांना राहायला घरे, बाजारपेठ आणि शहरीकरणाचा पाया सुरू झाला. वेगवेगळे मॉल तयार झाले  बाजारपेठ, व्यापारी चलन वलन वाढले. फ्लॅट पध्दती वाढली, गावातील वाडे, घरे आणि घरासमोर असलेल्या बागा गेल्या, रस्त्यांच्या दुतर्फा लावलेली झाडे कमी झाली, जुने वाडे धडाधडा पाडले गेले. तेथे मोठामोठया बिल्डिंग, मॉल आल्यामुळे हळूहळू शेतीवाडी कमी होउन त्याची जागा सिमेंटच्या जंगलांनी घेतली. उसाचे मळे, ज्वारीची शेते हयांची मजा गेली. प्रत्येकजण आपला धंदा कसा वाढेल आणि कुठे जास्त पैसा मिळेल हयाचा विचार करू लागला. मग काय गावातील बडी आसामी म्हणजे मुंदडा शेठ ने जणू ही स्वतःची जबाबदारी असल्यासारखे वागून भरपूर पैसा मिळवला. मुंदडा शेठ ने पैसा खूप कमावला. परंतू दोन्ही मुले शिकली तरी भारतात राहायला नकार दिल्यामुळे एक कॅनडा, एक अमेरिकेत असल्यामुळे ते नाराज झाले. काही दिवस एकटेच गावात राहिले. पण वाढत्या वयाबरोबर वेगवेगळया आजाराने ग्रासले जसे की हाय बी.पी. हृदयरोग, डायबिटीस इ. शेठचा बंगला मोठा होता. बाहेर झोपाळा, पुढे थोडे मैदान पण नैसर्गीक झाडे नव्हती. खूप दूर पर्यंत फ्लॅटस, मॉल दिसत होते. दुतर्फा लावलेली झाडे, फुलझाडे, अंगणातील तुळस, फुलझाडे कुठेच दिसत नव्हती. एकदा शेठ खूप आजारी पडले होते. डॉ. नी आशा

सोडली होती. डॉ. नी सांगितले आता यावर अॅलोपॅथीऐवजी आयुर्वेदीक उपाय करू या पण हयासाठी आपल्याला काळी तुळस जी औषधी असते ती लागेल.  त्यांचे नातेवाईक बरे म्हणून गेले पण तुळस शोधतात तर काय दूरपर्यंत झाडे दिसली नाही, कोणी थकून पारावर बसू म्हटले तर त्याची जागा मॉल ने घेतली, मग काय १० रू च्या चहासाठी ३० रू देउन बाहेर पडावे लागे. तेथील जंक फूड आणि शीतपेये घ्यावी लागली. तुळस कोठे दिसेना. शोधता शोधता नातेवाईक शेजारच्या गावात कधी शिरले ते लक्षात आले नाही. गावात अजुनही वाडी, वस्ती तुळसी होती, औषधी वनस्पती, सदाफुली, कडूनिंबाची झाडे, पिंपळाची झाडे, चिंचेची अशी पुष्कळ वनराई दिसली. आज जाउन मुंदडा शेठच्या नातेवाईकांचे येण्याचे प्रयोजन सांगितले. गावात अजुनही माणुसकी शिल्लक होती, ते लोक मुंदडा शेठसाठी तुळसी, सदाफुली जी हवी असतील ती वनस्पती देण्यासाठी तयार झाले. आतापर्यंत मुंदडाशेठना पण निसर्गाचे, वनराईचे महत्व पटले होते व स्वतःवर जशी शेजारच्या गावातील वनस्पती आणण्याची वेळ आली तशी कुणावर यायला नको म्हणून शेठनी आपल्या बंगल्यासमोर झाडे लावली, जोपासली व शेठ बरेही झाले.

बोलता बोलता शाळा आली आत ग्राउंडवर चक्कर मारली, नोटीस बोर्ड पाहिजे, बोर्डावरील नावे पाहिली. सर्व गावच्या गप्पा मारण्यात ३-४ तास कसे गेले कळले नाही. घाईने घरी परत आले. काकांनी व मी ज्यांना जमीन विकली त्यांना भेटायला गेले आणि काकांना सांगितले हया जमीनीचे तुम्ही काहीही करा पण थोडा भाग तरी मुलांना खेळायला आणि झाडे लावायला राखून ठेवा म्हणजे समाजसेवा आणि स्वतःचेही आरोग्य चांगले राहिल. काकांनी ही माझ्या निर्णयाचे स्वागत केले आणि तुझ्यासाठी पितृस्मृती नावाचा बगीचा तयार करण्याचे आश्वासन दिले आणि पाळले. आता सरकारनेही झाडे लावण्यासाठी ५ फुट चोहोबाजूंनी जागा सोडायचा नियम केला आहेच आणि त्यात झाडे लावा, झाडे जगवा हया संकल्पनेला दुजोरा दिला आहेच त्यामुळे परत हिरवाई येईलच.  खूप दिवसांनी माझ्या बागेत पेपर वाचत बसले आणि त्यातील मोठया अक्षराच्या बातमीने मन वेधून घेतले ती बातमी होती ह्या वर्षी पितृस्मृती गार्डनला आदर्श बगीचा म्हणून गौरवचिन्ह आणि काही लाखाचे बक्षीस देउन पुरस्कृत केले आहे.  ती बातमी खूप वेळा वाचत होते आणि मनोमन काकांनी दिलेल्या आश्वासनाचे वास्तवात रूपांतर झाल्यामुळे खूप समाधान वाटत होते.

****



सौ . किर्ती कुलकर्णी
९७६७१०३३७४

# २२ संस्कार

बात तीन चार वर्ष पुरानी है । किंतू आज भी मेरे मन मे जागृत है । हम राष्ट्र रक्षा समिती द्वारा हर वर्ष बॉर्डर पर जा कर जवानों को राखी बांधने का उपक्रम करते आ रहे है । बैतूल सांस्कृतिक सेवा समिती के तत्वावधान मे प्रतिवर्ष होने वाले इस प्रयास का मुझे बहोत अभिमान था । मैं सोचती थी कि मै उम्र के जिस पडाव वर हूं वहां तो हर जवान मेरे बेटे की उम्र का होगा और राखी तो भाई को बांधी जाती है । मै राखी कैसे बांधूंगी  किंतू एक बार शास्त्र चर्चा के दौरान मुझे पता चला कि रक्षा सूत्र तो काई भी, किसीको भी शुभेच्छा या आशिर्वाद के स्वरूप बांध सकता है । इंद्राणी ने  इंद्र को बांधा था । जब पत्नी अपने पती को बांध सकती है तो मै अपने पुत्रोसमान जवानोंको क्यों नही बांध सकती । यह विचार मन में आते ही जून महिने मे मैने संपर्क किया और अपनी इच्छा प्रकट की । समितीके मुख्य अधिकारी से बात होनेपर मै बहुत खुश हुई । उन्होने मेरी इच्छा का आदर रखते हुए साथ चलने की अनुमति दे दी ।

साथ में ४० + वयोगट की अन्य ५-७ भगिनी भी थी । अच्छा ग्रुप मिलनेपर मै तथा मेरे पति खुश थे । किंतू इस खुशीमें एक बाधा थी । हमारे कालनिर्णय पंचांग के अनुसार पूर्णिमा के दिन चंद्रग्रहण का योग था । इस बार बॉर्डर हमे जैसरमेर की मिल रही थी । मेरी उम्र के नुसार मै ज्यादा ठंडी और चढाईवाली जगहोंपर नही जा सकती । तो गरमी और ज्यादातर समतल रेगिस्तानी इलाके मे जाना अपेक्षाकृत सरल था । दुविधायुक्त मनःस्थिती मे हम तैयारी कर रहे थे । किसी ने कहा की सामाजिक एवं सामुहिक कार्य मे ग्रहण इ. का विचार नही करना चाहिये । डूबने को तिनके का सहारा इस उक्ति के अनुसार मन को समझा लिया । वैसे भी हमारे कॉलेज के दिनों मे जो भारत एवं पाकिस्तान का युध्द हुआ था उसमे इसी बॉर्डर पर पाकिस्तान के टैंको को हमारे जवानोंने धूल चराई थी । अमेरिका के पॅटर्न टैंक जो अभेद्य माने जाते थे उनपर जहाँ हमने विजय पायी इस रणभूमि को प्रत्यक्ष देखने का संजोग फिर कब मिलता ।

हम बीकानेर पहुंचे, वहांसे जैसलमेर मे तनोट माता मंदिर की धर्मशाला मे हमारा प्रथम विश्राम था । वही प्रसिध्द मंदिर जहां पाकिस्तान द्वारा फेके गये बम निष्प्रभ हो जाते थे । मॉ की आरती तथा उस जगह की देख रेख का जिम्मा बी.एस.एफ. जवान ही देखते है । वहीं पर मेरी मुलाकात प्रविण से हुई । हमारे दत्त के लिए खाना बनाने एवं सर्व्ह करने की जिम्मेदारी कुछ जवानोंपर थी । रविंद्र की डयुटी हमारी बस पर लगी थी और वह भी हमसे बहोत घुलमिल गया था । प्रविण से ज्यादा बात करने का मौका इसलिए मिला कि मेरा और प्रीती तिवारी पुलिस इन्स्पेक्टर का सोमवार का व्रत था । सावन सोमवार को हमे एक समय भोजन का व्रत था । सावन सोमवार को हमे एक समय भोजन

करना था और एक समय फरियाली । हमने सोचा सुबह साबुदाना की खिचडी बना लेंगे । सो हम रसोई में पहुंचे । मेरा नाम प्रविण है मै बिहार से हूँ । एक गोरे से स्मार्ट लडके ने कहा आपको क्या चाहिये ? उसने पूछा । प्रीतीजी ने कहा कल हमारा व्रत है । हम साबुदाने की खिचडी बनाना है । हमे तो नही आता . . . . उसने झिझकते हुए कहा हम बना लेंगे । आप केवल हमारे जरूरत की चीजे देना । एक कटोरे मे साबुदाना अभी फुलने के लिए डालना है । उसने झट से एक कटोरा लाया, उसे धोकर दे दिया । हम ने साबुदाना डालकर पानी निथारने के लिये कहा और हम वापस आ गए । दुसरे दिन उसने आलू, हरी मिर्च, जिरा आदि निकाल दिया । छुरी से आलू का काटने ही वाले थे कि उसने झट से दुसरा चाकू ला दिया, कहा आपका तो व्रत है ये लिजिये, उस छुरी से हम प्याज काटते है । मै अवाक् हो गई ।

सब बस मे बैठकर जाने लगे । प्रविण ने कहा आंटी रात मे आप जल्दी खाना खा लिजिएगा । उसका अपनापन देखकर मुझे अच्छा लगा । मै अपनी आदत के अनुसार उसे बेटा कह गई तो वह झुकर पैर पड लिया । रात मे सब टीम वापस आई और रक्षाबंधन का दौर शुरू हुआ । सब बारी बारी से आ रहे थे । प्रविण नही दिखा तो मै रसोई की तरफ गई । वह मंत्रजाप कर रहा था ।
दुसरे दिन सुबह मैने पूछा क्यों बेटे आप नही आए ? नही आंटी चंद्रमा ग्रहण मे थे । सुतक से लेकर ग्रहणकाल पूरा होने तक राखी नही बांधी जाती । ग्रहण के समापन पर नहा धोकर ही राखी बांधना होता है । उसने कहा हमे बहुत अच्छा लगा । एक जवान जो बॉर्डरपर तैनात है वह भी धर्म के पालन को लेकर इतना जागरूक है । जरासी शर्म भी आई कि हम सांस्कृतिक सेवा समिती वाले ही संस्कृती और संस्कार भूल रहे है ।

सुबह की आरती और वहां का अनुशासन देखकर बहोत अच्छा लगा । हर रोज शाम सुबह वहाँ मंजिरे, ढोलक और हार्मोनियम, ड्म के साथ आरती होती है । मै एक नही भूलने वाली अद्भूत एवं अद्वितीय अनुभव के साथ लौट आई ।



****

श्रीमती प्रतिभा देशपांडे,
९३४०२७५८४४ बैतूल (म.प्र.)

# २३. युध्दज्वराची खुमखुमी

*(लेखक हे सेवानिवृत्त लष्करी अधिकारी आहेत. सदरील विशेष लेख हा 'भारत देश स्वातंत्र्याची अमृतमहोत्सवी ७५ वर्षे' पूर्ण करीत असल्यामुळे समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच लेखकाने अनेक युध्दात सहभागी होऊन शत्रूंचा सामना केलेला आहे म्हणून संस्थेला त्यांचा अभिमान आणि गर्व आहे.)*

२० व्या शतकात दोन महायुध्दे जगाला झेलावी लागली. ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता ते साम्राज्य, राणीचे सरकार आर्थिकदृष्टया खिळखिळे होऊन, त्या साम्राज्याला अंकित असणाऱ्या 'गुलाम' देशाना हळूहळू स्वातंत्र्य देणे क्रमप्राप्त झाले. अमेरीका, रशिया साम्राज्य उदयास आले. जगाच्या नकाशात फेरफार होऊन जगाचा नकाशा कुठे आक्रसला तर कुठे विस्तारला. त्या फेरफाराचा चटका विसाव्या शतकाच्या मध्यास हिंदूस्थानाला खावा लागला. ५६५ संस्थानात विभागलेल्या हिंदुस्थानाची मधेमध चिरफाड होऊन पाकिस्तान हे नवीन राष्ट्र दक्षिण आशियात स्थापित झाले. पूर्व पाकिस्तान पूर्वेस तर हिमालयीन रांगा, खैबर खिंडीजवळ पश्चिम पाकिस्तान ही दोन छकले उदयास आली. हया दोन विभागात १६०० मैलाचे अंतर होते. व्दिराष्ट्रवाद पेटवून कायदे आझम बॅरीस्टर महंम्मद अली जिना यांच्या नेतृत्वात पाकिस्तान राष्ट्र जन्माला आले. हिंदुस्थानातील तत्कालीन 'अल्पसंख्याकांना' भूमी हवी होती म्हणून झालेली अमानूष हिंसक चिरफाड लाखो जनांची हत्या, अनेक संसार उध्वस्त. दोन टोकावर असणाऱ्या हया विभागांचे मनोमीलन कधी झालेच नाही. पाकिस्तान जन्माला घालणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये शेख मुजीब रहमान हे 'वंगबंधू' आघाडीवर होते, त्यांचा भ्रमनिरास झाला. सतत अनपेक्षित हिंदुस्थानावर हल्ला करणे. पूर्व विभागाला 'बटीक' म्हणून वापरणे हा पश्चिम विभागीय शासकांचा आवडता छंद होता. पूर्व पाकिस्तानमधील शांतीप्रिय सामान्य रयत नाखूष होती.

सन १९४७ देश स्वातंत्र्याच्या उंबरठयावर असताना 'हसके लिया पाकिस्तान, छीन के लेंगे हिंदूस्थान' अशा आरोळया देत २२ ऑक्टोबर १९४७ हया तारखेला रझाकार, टोळीवाले असे भासवून पाकिस्तानी प्रशिक्षीत सैन्याने 'काश्मिरवर' हल्ला केला. श्री. हरिसिंह डोग्रा हया राजाने भारतात विलीन होण्यास उशिर केला. त्याची संधी साधून हा हल्ला करण्यात आला. २६ ऑक्टोबर १९४७ ला काश्मिर संस्थान हिंदूस्थानात विलीन झाले. हिंदूस्थानी सैन्याला प्रतिकार करणे, काश्मिरचे संरक्षण करणे ही जबाबदारी आली. हया पाकिस्तानी सैन्याने लूटालूट, अत्याचार केले. हे करत असताना ते म्हणत होते 'आम्ही काश्मिरचे मुक्तिदाते' म्हणत अत्याचार

करत होते. हयालाच म्हणतात ‘मूँहमे राम, बगल मे छुरी’ हया युध्दात आपण १/३ काश्मिर गमावला. त्याला ते आझाद काश्मिर म्हणतात. आपण म्हणतो पाकव्याप्त काश्मिर ! हे युध्द चौदा महीने चालले. हया युध्दाचे कोड नाव होते ‘ऑपरेशन गुलमर्ग’ .... त्यानंतर २० ऑक्टोबर १९६२ रोजी हिंदूस्थानावर चीनने विश्वासघातकी आक्रमण केले. हया युध्दात आपली बरीच हानी झाली. हे युध्द २२ नोव्हेंबर १९६२ ला चीनने थांबवले. या युध्दापासून प्रेरणा घेत पाकिस्तानी शासक फिल्ड मार्शल आयुबखान हयांनी भारतावर हल्ला केला. मोहिमेला नाव होते ‘ऑपरेशन जिब्राल्टर’ व ‘ऑपरेशन ग्रँड स्लॅम’.

पाकिस्तानी सेनेचा होरा होता की, हिंदूस्थानाची चीनशी लढताना दमछाक झाल्याचे भारतीय सैन्याचे नैतिक सैनिकी खच्चीकरण झाले आहे. तेव्हा ही संधी साधून काश्मिर हस्तगत करावा. दुसरे कारण मध्यंतरीच्या काळात अमेरिकेने पाकिस्तानला अत्याधुनिक प्रचंड सैनिकी साहित्य पुरवून त्याच्या ‘युध्दज्वराला’ खतपाणी घातले गेले. तिसरे कारण दिलेले कुठलेही आश्वासन आयुबखान पूर्ण करू न शकल्याने पाकिस्तानी आवाम चिडली होती, क्रोधीत झाली होती. ‘इस्लाम खतरेमें है’ म्हणत आयुबने पाकिस्तानी जनतेचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला. चौथे कारण कै. लालबहादुर शास्त्री हा मध्यम वर्गीय सामान्य माणूस आपल्याला टक्कर देणार नाही. हा पाकिस्तानी लष्कराचा भ्रम. ह्या युध्दात पाकिस्तानी सैन्याला ‘मूँह की खानी पडी’ व युध्द थांबवून भारताशी ‘शस्त्रसंधी’ करावी लागली कारण हाजीफर खिंडीमधला भारताचा विजय, भारतीय सैन्याने लाहोर सेक्टर मध्ये वाघा बॉर्डर, खाली बर्की व खेमकरण – कसूर ते इच्छोगील कालव्यापर्यंत धडकी मारून पाकिस्तानी सैन्याचे तोंड काळे केले. आयुबखान या हुकूमशहास दाती तृण धरून माघार घ्यावी लागली. हे युध्द एप्रिल ते सप्टेंबर पर्यंत चालले.

या युध्दात पश्चिम किनाऱ्यावर मात्र पाकिस्तानी नौदलाने गुजरातच्या व्दारीका शहरावर बॉम्बफेक केली. पण फार नुकसान झाले नाही. भारतीय नौसेनेला प्रत्यूत्तर देण्यास परवानगी नव्हती. ह्या गोष्टीचा फायदा घेत पाकिस्तानी युध्दनौका खैबर ने व्दारकावर हल्ला केला. याचा फायदा होऊन सरकारने ओखा बंदरात नौसेनेचा एक तळ आय.एन.एस. व्दारीका ताबडतोब प्रस्थापित केला.

युध्दानंतर तत्कालीन नौसेना प्रमुख ॲडमिरल भास्करराव सोमण, पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना भेटून त्यांनी नाखूषी व्यक्त केली. सोमण यांनी राष्ट्रपतीना भेटण्याची परवानगी मागितली तेव्हा मा. शास्त्रीजनींनी ‘ॲडमिरल शांत हो भी जाओ’ असे म्हणत परवानगी नाकारली.

सन १९६२ च्या युध्दात वायुसेनेचा वापर टाळला तर १९६५ च्या युध्दात नौसेनेला वेसण घातली. सरकारी स्थरावर असा निर्णय का झाला ? हे आजही एक कोडे आहे. अन्यथा दोन्ही युध्दांचा शेवट भारताच्या बाजूने लागला असता.

सन १९६५ चा पराभव पाकिस्तानी सैन्य व समाजाला पचवता आला नाही. आयुबखान यांना बंडाळीची झळ लागण्यापूर्वीच त्यांनी राष्ट्रपती पदाची सूत्रे खाली ठेवून तत्कालीन सेनाधिकारी जनरल आगा मोहम्मद याह्या खान यांना सत्ता सुपूर्त करून आयुबखान यांनी देश सोडला. १९७१ चे युध्द हे १९४७–४८, १९६५ व १९९९ च्या युध्दापेक्षा फार वेगळे आणि भारतीय, विशेषतः भारतीय नौसेनेच्या टोपातला सोनेरी तुरा ठरले. या युध्दात कराची बंदरावर प्रचंड हल्ला चढवत भारतीय मिसाईल बोटस, भारतीय नौसेना पोत (Indian Naval Ship) नाशक, निरघट, निपत, विनाश, वीर, विद्युत यांनी अभूतपूर्व हल्ला करून कराची बंदर पेटवून दिले. अगदी लंका दहनाप्रमाणे आगीचे तांडव इतके प्रचंड होते की, अमेरिकेच्या 'गुप्त उपग्रहानी' त्याचे फोटो पाठवल्यावर व ते पाहिल्यावर अमेरिकन शासन सुध्दा दिग्मुढ झाले, स्तब्ध झाले, आणि या मिसाईल बोटीच्याला नाव पडले 'किलर २५'.
या युध्दात अमेरीका, चीन, पाकिस्तानला सर्वतोपरी मदत करण्यासाठी उतरले होते. हे युध्द पश्चिम व पूर्व किनाऱ्यावर लढल्या गेले, त्यामुळे हया युध्दातला नौसेनेचा पराक्रम भारतीय युध्दांच्या इतिहासात सोनेरी अक्षरांनी लिहला गेला. मी लढलो, तो क्षण माझ्या आयुष्यातला सर्वोच्च मानबिंदू मी मानतो. वाचकहो स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या २५ वर्षात, रौप्य महोत्सवात चार युध्दांना सामोरे जावे लागले, यातील १९७१ च्या युध्दात नौसेना सिंहाचा वाटा घेऊन लढली. त्यापूर्वी व त्यानंतर १९९९ च्या कारगील युध्दात भारतीय नौसेनेचा सहभाग फक्त गस्त घालणे व सागरी सिमांचे संरक्षण इतकाच शासनाने मर्यादीत केला होता.

१९७१ साली झालेल्या युध्दाच्या वरिष्ठ नेतागण व सेनाधिकाऱ्यांच्या होत असत तेंव्हा मंत्रीगण, सरसेनापती सॅम बहादूर माणेकशॉ, वायुसेना प्रमुख पी.सी.लाल हे आपली बाजू व मते हिरीरीने मांडत. सगळयात शेवटी मा. पंतप्रधान इंदिराजी ॲडमिरल नंदाना विचारत 'ॲडमिरल तुम्हाला काही बोलायचे आहे का ? ' ॲडमिरल नंदा मान हलवून नाही म्हणत, बैठक संपत असे, तेंव्हाच १९७१ च्या युध्दात नौसेना हया संधीचा फायदा घेऊन आपली क्षमता व महत्व सिध्द करेल हे ॲडमिरल सरदारीलाल मथरादास नंदा यांनी मनोमन ठरवले आणि नौसेनेने करून दाखवले. नौसेना अध्यक्ष पदावर नियुक्ती होताच ॲडमिरल नंदा यांनी ब्लिटज या साप्ताहिकाचे संपादक

आर.के. करंजीया यांना दिर्घ मुलाखत देऊन स्पष्ट केले होते. संधी मिळताच आम्ही पाकिस्तानाची युध्द ज्वराची ‘खुमखुमी’ उतरवू.

२५ वर्षात पाकिस्तानने हिंदूस्थानावर सन १९४७ ते १९७२ या कालावधीत तिन युध्दे लादली आणि प्रत्येक युध्दात मार खाल्ला. १९७१ चे युध्द फार आगळे वेगळे होते, त्याचा समग्र इतिहास आपण पाहणार आहोतच. या सर्व प्रत्येक युध्दात भारताने धडे घेऊन सैन्याचा विस्तार व विकास साधला. आज हिंदूस्थानी सैन्याचा जगात चौथा नंबर असून, प्रसंगी कोणालाही आपले सैन्य ‘चारी मुंडया चित करण्यास’ तयार आहे. पाकिस्तान सतत शस्त्रसंधी मोडतो. आतातर ‘अतिरेक्यांच्या भ्याड हालचाली’ नेमून ‘शीत युध्द’ खेळतो आहे, कारण पारंपारिक युध्दात भारत आपल्यावर मात करतो हे त्याला चांगले लक्षात आले आहे.

हिंदूस्थानी राजकिय नेते व लष्करी उच्चाधिकारी यांचा संयम जर तुटला तर ते पाकिस्तानला फार महागात पडेल. याचा अनुभव पाकिस्तानने १९६५ च्या युध्दात घेतला आहे. वामनमूर्ती कै. लालबहादूर शास्त्री यांनी ‘जय जवान, जय किसान’ ही घोषणा देऊरन ‘इट का जबाब, पत्थरसे देंगे’ असा इशारा देत भारताचा दृढसंकल्प आपल्या सैन्यदलाने लाहोरच्या वेशीपर्यंत पोहोचले. सन १९९९ च्या कारगील युध्दात ‘ये दिल मांगे मोर’ म्हणत प्रतिकूल परिस्थिती असताना शत्रूला धूळ चारली आहे. खरे तर १९८० पर्यंत हिंदूस्थान व पाकिस्तानी सैन्यामधील उच्चाधिकारी हे ‘ ब्रिटीश इंडीयात ’ खांद्याला खांदा लाऊन लढले होते. जनरल आगा मोहम्मद याह्यायाह्या खान यांचे प्रशिक्षण देहरादून येथील मिल्ट्री ॲकॅडमीत झाले होते. १९७१ चे भारतीय भूदलाचे चिफ ऑफ स्टाफ होते, फिल्ड मार्शल सॅम बहादूर माणेकशॉ हे याच ॲकेडमीच्या पहिल्या चमूचे विद्यार्थी होते. मेजर जनरल गंधर्वसिंग नागरा हे ढाक्याच्या वेशिवर पोचताच त्यांनी जनरल अब्दुल अमीर नियाजी या आपल्या मित्राला संदेश पाठवला ‘टायगर, तुझ्या दारात आम्ही उभे आहोत, शरणागती पत्कर, अन्यथा हकनाक तुमचे मुडदे पडतील.’

पश्चिम पाकिस्तानी हरप्रकारे पूर्व पाकिस्तानला आपल्या टाचे खाली ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न केले. परंतू चिवट बंगाली मुक्ती बाहीनीने भारतीय सैन्याच्या मदतीने हाणून पाडले. नूसता युध्दज्वर असून चालत नाही, त्याला संयमी सत्याचे अधिष्ठान असावे लागते. चीन व अमेरीकेच्या भरवश्यावर पाकिस्तानी सैन्य या युध्दात उतरले. भारतीय सैन्याच्या सुयोग्य व चपळ हालचाली तसेच योग्य त्या निर्णयामुळे पाकिस्तानची नामुष्की झाली. केवळ व्देष, मत्सर व वैर करून

पाकिस्तान हिंदूस्थानावर मात करू शकणार नाही. भारताचे सैन्य देशासाठी लढले तर अद्याप पर्यंत पाकीस्तानी सैन्य हे स्वार्थासाठी अत्याचार, लूटालूट, अनितीनी लढले, हा इतिहास आहे. बांगला देश मुक्ती संग्रामाने हे ठळकपणे सिध्द झाले आहे. आपल्याच धर्मबंधू व देशाच्या एका विभागातील जनतेवरील त्यांचे अत्याचार हे स्पष्ट करतात.

****




विनायक श्रीधर अभ्यंकर
निवृत्त लष्करी अधिकारी.
९७६६०४९०७१





**HOMEOPATHIC CONSULTANT**

**Dr. SHARAYU PURANKAR**
B.H.M.S., C.C.H., CGO (Mumbai)

- Paediatrics
- Joint Complaints
- Skin Complaints
- Respiratory Complaints
- Immunity Building

**Clinic Time :**
Mon to Sat. 10 to 12 Morning
Mon to Friday : 6 to 8 p.m. evening.

**Aarogyam**
201, 2nd Floor, Fortune Plaza,
Aamchi Colony, NDA - Pashan Rd.,
Opp. Bank of Maharashtra,
Bavdhan, Pune - 411 021.

**Mob. : 9545516227**





# 24. DEFENDERS OF THE ENVIRONMENT

Woman, as a whole, is referred to as a person who is responsible to take care of her children and elders in her family. There has been progress over the last decades: More girls are going to school, fewer girls are forced into early marriage, etc. and laws are being made to advance gender equality. Despite these gains women are facing many challenges in the society. Facing these challenges she has made her place in this world in almost all the areas like in Politics, Sports, Business, Writer, Actresses, and also as a successful environmentalist.

There are some people who are doing more than most, in order to save the world we live in. Among them, are a few women whose battle against climate change might be the inspiration. Floods in one part of the world while the other side faces severe drought, melting ice, rising temperatures, extinction or on the verge of extinction of many different species. While we cannot go back and change the past, we can try to undo the damage we have forced upon our planet.

**1. Saalumarada Thimmakka**



A 107-year-old Padma Shri, Saalumarada Thimmakka is an Indian environmentalist. Born in Gubbi taluk, Tumkur district, Karnataka, Thimmakkais referred as Saalumarada Thimmakka because of her work. At the age of 40, she wanted to end her life as she did not have child. But instead, She started planting banyan trees along with her husband and found a purpose in it. Both Thimmakka and her husband started with 10 banyan saplings on either side of the road along a stretch of 4 km in the first year. They took care of the plants just like their children. Every year, the count of these trees kept increasing. Till date, there have been more than 8000 other trees grown by her and her husband. Growing banyan trees was challenging in a place that was relatively dry.

**2. Tulsi Gowda :**



Tulsi Gowda is an Indian environmentalist from Honnali village, Ankola taluka in Karnataka state. Belonging to such a small village She was not able to go to school to get proper education. Being illiterate, she has made immense contributions towards preserving the environment. She has planted more than 30,000 saplings and looks after the nurseries of the Forest Department. In 2021, the Government of India honoured her with the Padma Shri, the country's fourth highest civilian award. Her work has been honored by the Government of India and various organizations. She is also known as the "Encyclopedia of Forest" for her ability to recognize the mother tree of any every species of tree.

## 3. Amla Ruia



Amla Ruia was born in Uttar Pradesh and belongs to a well wealthy family. One day while scrolling through TV channels, She felt very restless when she saw severe drought in a village from Rajasthan and people suffering from water shortage. She suddenly realised that sending money and clothing to victims of disasters was not a permanent solution. She set a mission to create water sources. She started her work from Ramgarh village in Rajasthan. It was like a bowl where all the rain water went right in. Finally, after six years of making drinking water 'kunds' (tanks) in Shekhawati area, the situation changed. Amla Ruia has brought water security to 100 villages of Rajasthan by using traditional rainwater-harvesting techniques and building check dams. Her constant efforts has helped bring water independence to hundreds of villages by improving ground water tables and live hand pumps and borewells that had run dry in the desert state. She founded the Aakar Charitable Trust which works to protect natural sources such as water, vegetation and soil.

## 4. Seed mother – Rahibai Popere



Rahibai Soma Popere, resident of remote Kombhalne village in Ahmednagar's Akola tehsil, has been conferred with the Padma award. She was unable to attend school due to poverty, so she began working as agricultural labour and cow rearing to support her family when she was ten years old. She married Soma Popere, also uneducated, when she was 17 years old. Agriculture was the family's sole source of income. She learned about agrobiodiversity, wild food resources, and traditional culture by practice and experience, despite not having attended school. Her father taught her about the different seeds and how to plant them. Later on she tried to hybrid the seeds. She has collected various types of seeds and to increase awareness she started gifting them to other people. Soon, she came to be known as a beej mata. Rahibai travelled across Maharashtra to collect different types of seeds.

Looking at the enthusiasm and devotion towards conserving the nature. Everyone should have some or the other way to try to protect our environment from further damage.

****



**Shubhangi Yogesh Mahashabde**
**97300 20495**

## २५. थोडेच पण महत्वाचे ....

बाबू डिसोजा
संग्राहक,
ज्येष्ठ कवी तथा लेखक
९८९०५ ६७४६८



१) जीवनदायी वृक्ष :
वड, उंबर, पाखर, नांद्रुक, पिंपळ

२) देवालये / मंदिराभोवती लावण्यास योग्य झाडे
वड, उंबर, पाखर, पिंपळ, बेल, कदंब, शमी, आपटा, चिंच, चाफा, कडूनिंब, कांचन

३) रस्त्याच्या कडेला लावण्यास योग्य झाडे
कडूनिंब, सप्तपर्णी, करंज, वरवंटा (सॉसेज ट्री), जारूळ, अमलतास, वड, उंबर, पाखर, नांद्रुक, पिंपळ, चिंच, शिसन, शिरीष

४) उद्यानात लावण्यास योग्य झाडे
पारिजातक, बकुळ, आवळा, उंबर, अमलतास, बांबू (पिवळा), जारूळ, रक्तचंदन, सिल्वर ओक, आंबा, कुसुंब, सप्तपर्णी, बदाम, सीता अशोक, कदंब.

५) जलदगतीने वाढणारी झाडे
बकाणा, भेंडी, पांगारा, आकाशनिंब (बुच), महारूख, शाल्मली (सावर), कदंब

६) फळझाडे
बोर, चिंच, आवळा, मोहा, टेंभुर्णी, खिरणी, शिवण, जांभूळ, नारळ, शिंदी, ताडफळ, सीताफळ, रामफळ, कवठ, फणस, लिंबू, पेरू, चारोळी, आंबा.

७) शेताच्या बांधावर उपयुक्त झाडे
खजुरिया, शिंदी, ताडफळ, बांबू, हादगा, शेवरी, तुती, भेंडी, तुळस, कढीलिंब

८) शेताच्या कुंपणासाठी
सागरगोटा, चिल्हार, शिकेकाई, हिंगणी (हिंगण बेट), घायपात, जेट्रोफा (वन एरंड)

९) सरपणासाठी उपयुक्त झाडे
देवबाभूळ, खैर, बाभूळ, हिवर, धावडा, बांबू, सुरू.

१०) औषधी झाडे
हिरडा, बेहडा, आवळा, अर्जुन, कडूनिंब, करंज, रिठा, निरगुडी, शिवन, टेंटू.

११) वनशेतीसाठी उपयुक्त : आवळा, अंजीर, फणस, चिंच, खिरणी, खजुरिया शिंदी, तुती, करवंद

१२) शेत जमिनीची सुपीकता वाढविणारी झाडे : उंबर, करंज, शेवरी

१३) घराभोवती लावण्यास उपयुक्त : रक्तचंदन, चंदन, उंबर, बकुळ, पारिजातक, बेल, कुसुंब

१४) कालव्याच्या काठाने लावण्यास उपयुक्त : वाळूंज (विलो), ताडफळ.

१५) बारा तासापेक्षा अधिक काळ प्राणवायू देणारी झाडे : वड, पिंपळ, उंबर, नांद्रुक, कडूनिंब, कदंब.

१६) औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण निवारण करण्यासाठी
पिंपळ, पेल्टोफोरम, पुत्रजीवी, उंबर, अशोक (उंच व पसरणारा), शिरीष, आंबा, सीताफळ, जांभूळ, सप्तपर्णी, अमलतास, पेरू, बोर, कडूनिंब, आवळा, चिंच, कदंब, बेल.

१७) धुलीकण व विषारी वायूपासून निवारण
सर्व जीवनदायी वृक्ष, आंबा, अशोक, बकुळ, रेन ट्री (वर्षा वृक्ष), जास्वंद, पारिजातक, रातराणी, मेहंदी, तुळस.

१८) हवामान स्वच्छ ठेवणारी झाडे : सर्व जीवनदायी वृक्ष, थुजा, पळस, सावर (शाल्मली), कदंब, गुलमोहर, अमलतास.

१९) हवेतील प्रदूषण दर्शवणारी झाडे : हळद, पळस, चारोळी. हवेतील प्रदूषण मर्यादेपलीकडे गेल्यास वरील झाडांची पाने, फुले, साल, फळे यात विकृती निर्माण होते.

२०) रस्त्याच्या मधील भागात लावण्यास उपयुक्त झाडे
कोरफड, शेर, रूई, जेट्रोफा, अश्वगंधा, निवडुंगाचे प्रकार ही झाडे वाहनामधून निर्माण होणारे वायूशोषण करून परिसर स्वच्छ ठेवतात.
(कल्पवृक्ष फेसबुकवरून साभार)

****


## सृष्टीमार्ग संस्था

Regd. No. Mah/275/2014/Pune | Trust Regd.No. F/45958/P

**देणगीदार, जाहिरातदार, सर्व कार्यकर्ते आणि शुभेच्छुक या सर्वांचे मनस्वी आभार.**

सृष्टीमार्ग संस्था, यांचे विक्रीसाठी उपलब्ध असलेले साहित्य आणि डीव्हीडी
१. सृष्टीमार्ग २. सण पर्यावरण साजिरे ३. निसर्ग मिमांसा ४. मानवपर्व ५. The Resemblance
६. डीव्हीडी सृष्टीमार्ग (हिन्दी) ७. मानवपर्व – ऑडीओ सीडी ८. निसर्गवाणी पत्रिका



रजि. कार्यालय : ०३, नक्षत्र अपार्टमेंट, विवेकनगर, आकुर्डी, पुणे – ४११ ०३५.
www.srushtimarg.org E mail : srushtimarg@gmail.com





**MIND VIEW**

*Train Your Mind*
*Manage Your Emotions*

: 99208 11725
: mindview.shruti@gmail.com
: Mind View by **Shruti Petare**
: mindviewshruti.com

## Shruti Petare

MSW Counseling

- Behavioral Counselor
- Certified Career Counselor
- CBT & REBT Practioner
- Life Coach & Spritual Guide
- Reiki Practioner
- Academic Counselor for IGNOU at Somaiya College Mumbai

**COUNSELLING FOR :**

- Children & Adolescent
- Couple & Family
- De-addiction
- Depression
- Anxiety, OCD & Phobia
- Anger, Stress & Time Management
- Career Counseling along with 550 Career Cluster and Conducting Psychometric test + 1 Year Access of Dashboard

The Behavioral Counseling sessions and Psychometric tests for Career Guidance (Aptitude, Interest and Personality) are conducted Online.

We use various platforms like Zoom, Google Meet, Skype, WhatsApp Video calls. 100% Confidentiality is maintained.



# सृष्टीमार्ग संस्था, आकुर्डी आणि बावधन

**संस्थेच्या पुढील वाटचालीस**
**हार्दिक शुभेच्छा !**





*** शुभेच्छुक ***

**वसंत देशपांडे**

एच-३०४, रूणाल्स रॉयल कासा,
भोंडवे कॉर्नर, बँक ऑफ महाराष्ट्रजवळ,
रावेत, पुणे - ४१२ १०१.
मोबा. ८९८९४ ४२३७६ / ९३७०२ ७२२४६.